कृषीवल
रायगड, गुरुवार, दि. २६ डिसेंबर २०२४
किंमत ४ ₹

# नो सेफ्टी, नो एन्ट्री

- लाईफ जॅकीट नसल्याने जंजिरा किल्ल्यात प्रवेश नाही
- बंदर अधिकाऱ्यांच्या निर्णयाने काहीशी नाराजी व्यक्त

। आगरदांडा । प्रतिनिधी ।

मुरुड हे पर्यटनाचे क्षेत्र असल्याने नाताळाची सुट्टी साजरी करण्यासाठी बुधवारी (दि. २५) शेकडोंच्या संख्येने विविध जिल्ह्यांतून पर्यटक मुरुड राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी दाखल झाले होते. परंतु, नुकत्याच मुंबईतील बोट दुर्घटनेमुळे स्थानिक प्रशासन अलर्ट झाले असून, चोख बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. जंजिरा किल्ल्यात प्रवाशांना सोडणाऱ्या बोटींमध्ये सेफ्टी लाईफ जॅकेट नसल्याने बंदर अधिकाऱ्यांनी पर्यटकांना बोटीत बसू दिले नाही. त्यामुळे पर्यटकांची नाराजी ओढावून घ्यावी लागली. तात्काळ एवढी जॅकेट उपलब्ध होऊ शकत नसल्याने बोट मालकांनाही जेवढी जॅकेट्स, तेवढ्याच पर्यटकांना परवानगी मिळाल्याचे दिसून आले.

> वरिष्ठांकडून आदेश असल्याने मी यामध्ये काहीही करू शकत नाही. संरक्षणासाठी सेफ्टी जॅकेट बोटीत असणं क्रमप्राप्त आहे. बोटधारकांनी याची सवय करायला पाहिजे.आज बोटीत सेफ्टी जॅकेट असते, तर लहान मुलांना किल्ला न बघता परतावे लागले नसते. तरी सर्व बोट धारकांनी नियमांचे पालन करावे.
> – सतीश देशमुख, बंदर निरीक्षक, राजपुरी

दरम्यान, मुंबई, पुणे, ठाणे, सातारा, पनवेल, नाशिक, वाई आदींसह राज्यभरातून पर्यटक गाड्या घेऊन सकाळच्या दरम्यान किल्ला पाहण्यासाठी आले होते. बोटीत लहान मुलांना नो एन्ट्री केल्याने पर्यटकांनी नाराजी दर्शवली. गेटवे ते एलिफंटा या ठिकाणी जाताना पर्यटकांच्या बोटीला नेव्हीच्या बोटीने जोरदार धडक दिल्याने बोट फुटून यामध्ये लहान मुलांसह १३ जणांचा समुद्रात बुडून मृत्यू झाल्याची घटना ताजी असल्याने प्रशासन अलर्ट झाले आहे. पान २ वर


● (छायाचित्र : गणेश चोडणेकर )



# पर्यटकांनी किनारे फुल्ल

। अलिबाग । प्रतिनिधी ।

राज्यभरासह परराज्यांतील पर्यटकही नाताळच्या सुट्टीनिमित्त रायगड जिल्ह्यात पर्यटक दाखल झाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले आहेत. नाताळची सुट्टी त्याचबरोबर वर्षअखेरच्या सेलिब्रेशनसाठी मुक्कामी आलेल्या पर्यटाकांमुळे रिसॉर्ट आणि हॉटेल्स हाऊसफुल्ल झाल्याची माहिती हॉटेल व्यावसायिकांकडून देण्यात आली आहे. यंदा ऑनलाईन बुकिंगच्या माध्यमातून आधीच बुकिंग करण्यात आली आहे. हॉटेल व्यावसायिकांनी विविध आकर्षक सवलती पर्यटकांसाठी जाहीर केल्याने पर्यटकही सुखावले असून, सुट्टीचा मनसोक्त आनंद घेताना दिसून येत आहेत. यावेळी कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवण्यात आला आहे.

## रायगडला पसंती; नाताळच्या सुट्टीचा घेतला आनंद

मुंबईसह अन्य ठिकाणच्या पर्यटकांना रायगडातील समुद्रकिनाऱ्यांचे आकर्षण वाढत असल्याचे मागील अनेक वर्षांपासून दिसून येत आहे. त्यामुळे नाताळ आणि थर्टी फर्स्ट साजरा करण्यासाठी लाखोंच्या संख्येने पर्यटक रायगडात दरवर्षी दाखल होत असल्याचे दिसून येते. परिणामी, पान २ वर

## जलवाहतुकीला अल्प प्रतिसाद

रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे पर्यटकांनी जलमार्गाला पसंती दर्शविली असली तरी अपेक्षित गर्दी नव्हती. पीएनपी, अंजठा, मालदार आदी जलसेवेतून पर्यटक मुंबईकडे रवाना होत होते. परंतु, मध्यंतरी घडलेली बोट दुर्घटना त्याचबरोबर मधला वार असल्याने जलमार्गाने प्रवासाला अपेक्षित प्रतिसाद नसल्याचे काही व्यावसायिकांनी सांगितले.

> नववर्षाच्या स्वागतासाठी जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून किनाऱ्यांसह अनेक ठिकाणी चेकपोस्ट करण्यात आले असून, मद्यपी, अतिउत्साही पर्यटकांची कसून चौकशी करण्यात येईल. तसेच दोषींवर कडक कारवाईदेखील करण्यात येणार आहे. वाहतुकीचे नियंत्रण करण्यासाठी तसेच हुल्लडबाजांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे.
> – सोमनाथ घार्गे, जिल्हा पोलीस अधीक्षक

## महामार्गावर वाहतूक कोंडी



**कोलाड :** मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड बाजापेठेत बुधवारी (दि.२५) नाताळच्या सुट्टीचा आनंद घेण्यासाठी गोव्याकडे जाण्यासाठी चाकरमानी यांनी सकाळी पहाटे सहापासून गर्दी केली आहे. यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागून वाहतूक कोंडी निर्माण झाली. यामुळे यातून मार्ग काढताना प्रवाशांची तारांबळ उडाली असल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

महामार्गावरील कोलाड (आंबेवाडी) बाजारपेठेत चौपदरीकरणाचे काम सुरु असल्यामुळे येथील येणारी-जाणारी वाहतूक बायपास रस्त्यावरून वळविण्यात आली; परंतु नाताळची सुट्टी असल्यामुळे असंख्य चाकरमानी सुट्टीचा आनंद घेण्यासाठी दुचाकी, पान २ वर

आजचा अग्रलेख
**प्रश्न पास-नापासाचा नाही**

## वे|ध|क

### विमान दुर्घटनेत ४२ ठार

**नवी दिल्ली :** अझरबैजानहून रशियाला जाणारे विमान प्रवासी विमान कझाकिस्तानमध्ये कोसळून अपघात झाला. या विमानामध्ये विमानात सुमारे ६२ प्रवासी आणि पाच क्रू मेंबर असे ६७ लोक होते. या दुर्घटनेत ४२ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती कझाक परिवहन मंत्रालयाने दिली आहे. या अपघातात २५ जण बचावले असल्याचे सांगण्यात येत आहे. हे विमान अझरबैजानमधील बाकू येथून रशियातील चेचन्याची राजधानी ग्रोझनी येथे जात होते. पक्ष्यांचा थवा विमानावर आदळल्याने नियंत्रण सुटल्याची प्राथमिक माहिती आहे.

### हत्येच्या घटनेने पुणे हादरले

**पुणे :** बलात्काराचा गुन्हा मागे घेण्यासाठी आणि प्रेयसीच्या नवऱ्याला धडा शिकविण्याच्या नादात माथेफिरु विकृत प्रेमीने प्रेयसीच्या मुलाचे अपहरण करून हत्या केल्याचे १५ दिवसांनंतर उघड झाले आहे. निरगुडसर (ता. आंबेगाव) येथून १२ वर्षीय विद्यार्थ्याचे अपहरण करुन हत्या करण्याची धक्कादायक घटना दि.११ ते २४ डिसेंबरदरम्यान घडली आहे. २४ डिसेंबर रोजी मयत विद्यार्थी आर्यनचा मृतदेह संगमनेरजवळील राजापूर परिसरात एका कोरड्या विहिरीत मिळून आला. आरोपी राजेश जंबुकरनेही राहत्या घरात फाशी घेऊन आत्महत्या केल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

# गायब ई-रिक्षा माथेरानमध्ये दाखल

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान पालिकेने सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने माथेरान शहरात पायलट प्रकल्प राबविण्यासाठी पर्यावरणपूरक ई-रिक्षा खरेदी केल्या होत्या. त्या सात ई-रिक्षांपैकी दोन रिक्षा शहरातून गायब होत्या. त्याबाबत 'कृषीवल'मध्ये २३ डिसेंबर रोजी बातमी प्रसिद्ध झाल्यानंतर दुरुस्तीसाठी पनवेल येथे पाठवण्यात आलेली ई-रिक्षा अगदी सकाळी माथेरान शहरात पोहोचली आहे. दरम्यान, कृषीवलच्या या सामाजिक बांधिलकीबद्दल माथेरानकरांनी कौतुक केले आहे. याप्रकरणी ई-रिक्षा सांभाळण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी थेट जिल्हाधिकाऱ्यांकडे केली जाणार आहे. पान २ वर

**कृषीवलच्या दणक्याने अधिकाऱ्यांची पळापळ**



### कृषीवलचे कौतुक

यानिमित्ताने माथेरान शहरातील नागरिकांनीदेखील कृषीवलच्या शोधपत्रकारितेचे कौतुक केले असून, ई-रिक्षा सांभाळण्याची जबाबदारी असलेले कार्यलयीन अधीक्षक सदानंद इंगळे यांनी खरी माहिती जनतेला सांगावी, अशी विचारणा समाज माध्यमांवर केली आहे. त्याचवेळी पालिकेच्या अधिकाऱ्यांनी त्याबाबत सत्य माहिती जनतेला द्यायला हवी, असे आवाहनदेखील केले आहे.

कृषीवल इफेक्ट

# मिळकतखार अनधिकृत भराव भोवणार

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार येथील सागरी किनारी धनदांडग्यांनी अनधिकृत भराव केला. महसूल प्रशासनाच्या कारवाईनंतर हे काम थांबविण्यात आले. मिळकतखार येथील अनधिकृत भरावाचे प्रकरण अडचणीत येण्याची शक्यता वर्तविली जात आहे. २००५ पासून गुगल ई-मेज, एमआरसॅककडील नकाशाचे अवलोकन करुन संबंधित विभागाकडून कारवाई केली जाणार आहे. तेथील कांदळवनाची तोड केल्याचे अहवालानुसार स्पष्ट होणार आहे.

अलिबाग तालुक्यातील मिळकतखार अनधिकृत भरावप्रकरणी प्रशासनाने आता ठोस कारवाई करण्याची भूमिका घेतली आहे. अलिबागचे प्रभारी उपविभागीय अधिकारी श्रीकांत गायकवाड यांनी या प्रकरणात कांदळवनाची प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन करण्याच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाने जनहित याचिका क्र. ८७/२००६ मध्ये दि.१७/०९/२०१८ रोजी दिलेल्या आदेशानुसार या जागेची स्थळ पाहणी करून तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश वन विभागाला दिले आहेत.

तक्रारदार जगदीश नाना म्हात्रे, यांनी अर्जात नमूद केलेल्या जागेबाबत प्राप्त तक्रारीनुसार प्रश्नाधिन मिळकतींची २६ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी साडेअकरा वाजण्याच्या सुमारास संयुक्त स्थळ पाहणी करून व मोजमापे घेऊन त्या ठिकाणी कांदळवन तोड झाली आहे का? याबाबत पडताळणी केली जाणार आहे. २००५ पासून गुगल ईमेज, एमआरसॅककडील नकाशाचे अवलोकन करुन तसेच वस्तुस्थितीबाबतचे फोटोग्राफ (अक्षांश व रेखांसह) सर्व संबंधित यंत्रणांनी एकत्रित स्वाक्षरीचा अहवाल अलिबाग व मुरुड तालुका स्तरावर गठीत केलेली समितीचे सचिव तथा परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग यांच्या कार्यालयास तात्काळ सादर करावा. तसेच सचिव तथा परिक्षेत्र वन अधिकारी अलिबाग यांनी परिपूर्ण अहवाल पान २ वर

### कांदळवनाच्या संरक्षणासाठी समिती गठीत

कांदळवनाचे प्रभावीपणे संरक्षण व संवर्धन व्हावे,यासाठी तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती स्थापन करण्याबाबत विभागीय आयुक्तांनी निर्देशन दिले आहेत. कांदळवन क्षेत्र असलेल्या (अलिबाग व मुरुड) तालुक्यामध्ये तालुका स्तरावर सदस्यांची समिती गठीत केली आहे. तालुका स्तरावर उपविभागीय अधिकारी अलिबाग हे अध्यक्ष असून, वन परिक्षेत्र अधिकारी सदस्य सचिव आहेत. तसेच तहसिलदार, उप अधीक्षक, भूमी अभिलेख, गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मुख्याधिकारी, नगर परिषद, पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व मंडळ अधिकारी यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

## मेरी ख्रिसमस, हॅप्पी ख्रिसमस...



● नाताळनिमित्त अलिबागमधील नाझरेथ चर्चला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. (छायाचित्र : समीर मालोदे)

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार करुन हत्या

**ठाणे :** कल्याण पूर्व येथील १३ वर्षीय मुलीचे अपहरण करून तिची हत्या करणारा नराधम विशाल गवळी याचा शोध पोलिसांनी सुरू केला आहे. सदर मुलीला दुकानातून खाऊ घेऊन परतताना गवळी याने जबरदस्तीने उचलून रिक्षात घालून पळवून नेल्याचे सीसीटीव्हीत दिसून आले आहे. या सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी रिक्षा चालकाला ताब्यात घेतले असून, मुख्य आरोपी विशाल गवळीसह त्याची पत्नीला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथून आरोपीला तर राहत्या घरातून त्याच्या पत्नीला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल गवळीची तीन लग्ने झाली आहेत.

# सायकलवरुन पडून चिमुकल्याचा मृत्यू

## बामणसुरे येथील घटनेने हळहळ

। सोगाव । वार्ताहर ।



अलिबाग तालुक्यातील चोंढी बामणसुरे येथे सोमवारी (दि. २३) संध्याकाळच्या वेळी दुःखद घटना घडली. प्रशांत विचारे यांचा नऊ वर्षीय मुलगा मिहीर विचारे हा सायकलवरून पडून जखमी झाला होता, त्याला अधिक उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केले होते. मात्र, उपचाराला प्रतिसाद न मिळाल्यामुळे त्याचे निधन झाले आहे. त्याच्यावर रात्री उशिरा बामणसुरे येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कारावेळी विचारे यांचे नातेवाईक, मित्रपरिवार, राजकीय व सामाजिक क्षेत्रातील तसेच पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुलाच्या अकस्मात मृत्यूबाबत पंचक्रोशीत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, बामणसुरे येथील पान २ वर

## सागरी मार्गावर नवीन वर्षात धावणार अत्याधुनिक स्पीड बोटी

# जेएनपीए-मुंबई प्रवास फक्त 35 मिनिटांत

। चिरनेर । प्रतिनिधी ।

**जेएनपीएने लाकडी प्रवासी बोटींना सरत्या वर्षात अलविदा करण्याचा निर्णय घेतला आहे. नवीन वर्षापासून बंदरातून मुंबईत प्रवाशांना घेऊन जाण्या-येण्यासाठी अद्ययावत स्पीड बोटी धावणार आहेत. या प्रदूषणविरहीत स्पीड बोटीमुळे ३५-४० मिनिटांत प्रवाशांना जेएनपीए-मुंबईदरम्यान पोहोचता येणार आहे. याचा फायदा या सागरी मार्गावरुन प्रवास करणाऱ्या सर्वांनाच होणार आहे.**

जेएनपीए बंदरातून मुंबईत येण्या-जाण्यासाठी याआधी लाकडी बोटींची व्यवस्था आहे. ही सागरी व्यवस्था जेएनपीएचे कामगार, प्रकल्पग्रस्त, कस्टम, एअरफोर्स, सीआयएसएफ आणि फॅमिली मेंबर्स, पोर्ट युजर्स आदी कामगारांसाठी उपयुक्त ठरत होती. सकाळी सहा वाजल्यापासून रात्री दहा वाजेपर्यंत या सागरी मार्गावरुन लाकडी बोटी सोळा फेऱ्या प्रवासी वाहतूक करीत होत्या. यासाठी जेएनपीए दरमहा १९ लाख ६८ हजार खर्च करीत आहे.

दरम्यानच्या काळात उरणपर्यंत रेल्वे सुरू झाली आहे. त्याशिवाय वाहतुकीसाठी अटल सेतूही खुला झाला आहे. यामुळे या जेएनपीए-गेटवे (मुंबई) या सागरी मार्गावरील प्रवासी वाहतूक रोडावली आहे. त्यानंतर जेएनपीएनेही बोटींची संख्या कमी करुन आता मागील काही महिन्यांपासून आठपर्यंत आणून सोडली आहे. मात्र, त्यानंतरही प्रवासी संख्या घसरणीलाच लागली आहे. त्यामुळे प्रवासी संख्या कमी झाल्याने व लाकडी बोटी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातूनही उपयुक्त नसल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे अंतर्मुख होऊन जेएनपीए प्रशासनाने लाकडी प्रवासी बोटी बंद करण्याचा निर्णय घेऊन त्याजागी प्रदूषणविरहित इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या अत्याधुनिक तंत्रज्ञान व सोयी-सुविधांनी सुसज्ज असलेल्या स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारला आहे.

प्रदूषणविरहीत, सुरक्षित आणि कमीवेळेतमुंबईतये-जाकरण्यासाठी स्पीडबोटींचा पर्याय स्वीकारण्याची संकल्पना वर्षाभरापूर्वीच जेएनपीएचे अध्यक्ष उन्मेष वाघ यांनी अंमलात आणण्यासाठी सूचना केली होती. त्याची अंमलबजावणी सुरू करण्यासाठी जेएनपीए प्रशासनाने जय्यत तयारी सुरू केली असल्याची माहिती जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली. पान २ वर

### ३८ कोटींच्या खर्चाला मंजुरी

उन्हाळी हंगामात २०-२५ प्रवासी व पावसाळी हंगामात १०-१२ क्षमतेच्या हरित सागर आणि हरित नौका या दोन वेगवान बोटी नवीन वर्षाच्या फेब्रुवारीच्या सुरुवातीलाच प्रवासी वाहतुकीसाठी जेएनपीटीच्या सेवेत दाखल होणार आहेत. प्रवाशांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून सुसज्ज असलेल्या स्पीडबोटींमुळे जेएनपीए-मुंबईदरम्यानचा सागरी प्रवास अवघ्या ३५ ते ४० मिनिटांत शक्य होणार आहे. जेएनपीएने १० वर्षाच्या या दोन स्पीड बोटींच्या ३७ कोटी ८९ लाख ९४ हजार १९० खर्चाच्या निधीलाही २० डिसेंबर २०२४ रोजी झालेल्या बोर्ड ऑफ ट्रस्टींच्या बैठकीत मंजुरी दिली आहे, अशी माहिती जेएनपीएचे उपसंरक्षक कॅप्टन बाळासाहेब पवार यांनी दिली.



# खोपोली शिळफाटा येथे टँकर पेटला



। खोपोली । प्रतिनिधी ।

पुण्याहून मुंबईकडे निघालेला भरधाव टॅंकर बोरघटातून खोपोली शिळफाटा येथे येत असताना वाहनावरी ताबा सुटल्याने विद्युतवाहिणीच्या डीपीला धडक दिल्याने टॅंकर पलटी झाला. यादरम्यान चालक आणि साथीराने उडी मारल्याने जीव वाचला, मात्र टॅंकरमधील केमिकलने पेट घेतल्याने आगीत पार्किंग केलेली एक कार जळून खाक झाली आहे. सदर घटना बुधवार २५ डिसेंबर रोजी सकाळी ६.३० वाजण्याच्या दरम्यान घडली आहे. या पेटत्या टँकरमधून वाहणार रसायन पेटत पसरत असल्याने परिसरात घबराटीचं वातावरण पसरले होते. या घटनेची माहिती मिळताच बचाव पथक, अग्नीशमन दल घटना स्थळी दाखल झालं होत आगीवर नियंत्रण मिळवण्याचा पान २ वर

कृषीवल
रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)


# स्वच्छतेसाठी दिवेआगर पॅटर्नची गरज

## कचरा टाकणाऱ्या सात जणांवर दंडात्मक कारवाई; ५५ हजार रकमेची वसुली

**। दिघी । वार्ताहर ।**

श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असणाऱ्या दिवेआगर ग्रामपंचायतने परिसरात होणारा कचरा रोखण्यासाठी महत्वाचे पाऊल उचलले आहे. गाव स्वच्छता मोहिमेअंतर्गत सूचना फलक लावून जनजागृती करत कचरा करणाऱ्यावर कारवाई करण्यात येत आहे. त्यानुसार दोन आठवड्यात आतापर्यंत ७ जणांकडून ५५ हजारहून अधिकचा दंड ग्रामपंचायतने वसूल केला आहे.




देशभरात प्रसिद्ध असणाऱ्या दिवेआगर पर्यटन स्थळाला आता धार्मिक स्थळाची मोठी ओळख मिळत आहे. येथे हजारोंच्या संख्येने राहण्यासाठी लॉजिंग, निवास आणि न्याहरीचे हॉटेल असून घरगुती साधारण व त्या व्यतिरिक्त प्रमुख खानावळी सोबत अधिक दर्जेदार होम स्टे सुद्धा आहेत. त्यामुळे पर्यटकांचा ओघ वाढला आहे. मात्र, कचऱ्याच्या समस्येमुळे दिवेआगर पर्यटन स्थळाचे विद्रुपीकरण होत असताना ग्रामस्थांनी आपला परिसर नियमित स्वच्छता राखण्याचे आवाहन ग्रामपंचायतीकडून करण्यात आले. तरी कारवाईची भीती वाटत नसल्याने असंख्य प्रकारच्या प्लास्टिकचा भस्मासुर येथील रस्ता, नदी - नाल्यात पाहायला मिळत होता.

शेवटीदिवेआगरचासमुद्रकिनारा नेहमी स्वच्छ, सुंदर आणि आकर्षक राहून सदैव पर्यटकांनी गजबजून जावा. यासाठी या पर्यटन स्थळाला जोडणारे बोर्लीपंचतन, भरडखोल व वाकडा पूल असे तीन मार्गावरील प्लास्टिक पिशव्या, खाद्यपदार्थाचे रॅपर्स, थर्माकोल, मिनरल वॉटर व कोल्ड्रिंक्सच्या बाटल्यामुळे होणारा कचरा रोखण्यासाठी दिवेआगर ग्रामपंचायतने दंडात्मक कारवाईचा धडाका सुरू केला आहे. त्यामुळे होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यात यश आले आहे. याचप्रमाणे तालुक्यातील इतर ग्रामपंचायतीने गावाच्या स्वच्छतेसाठी दिवेआगर पॅटर्न राबवावा अशी मागणी जनमाणसातुन करण्यात येत आहे.

> **दिवेआगर हे पर्यटन स्थळ आहे. त्यामुळे ग्रामस्थांना आपला परिसर नियमित स्वच्छता राखण्याचे आवाहन करतो. अशाप्रकारे जर कोणाकडून कचरा टाकून दुर्गंधी पसरून पर्यटनाचा ऱ्हास होत असेल त्याच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. यात कोणाचीही गय केली जाणार नाही. – सिद्धेश कोसबे, सरपंच दिवेआगर.**

# पगार थकल्याने कर्मचारी आक्रमक

## ■ हिल (इंडिया) लिमिटेड कंपनीविरोधात बेमुदत आंदोलन

**। रसायनी । वार्ताहर ।**

भारत केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या रसायनीतील हिल (इंडिया) लि. कंपनीतील प्लांटमध्ये २० वर्षांहून अधिक दिवस काम करणाऱ्या कॅन्टीन कर्मचाऱ्यांचा ३२ महिन्यांचा पगार आणि सर्व आवश्यक सुविधा रोखून ठेवल्यामुळे कॅंटीन कर्मचारी संतप्त झाले आहेत.त्या अनुषंगाने २६ डिसेंबरपासून कंपनीचा गेट बंद करून व्यवस्थापनाने केलेल्या शोषणाचा निषेध करत बेमुदत आंदोलन पुकारले आहे.

दिल्लीच्या मुख्य कार्यालय येथून मिळालेल्या मान्यतेनुसार ६ वर्षांपासून कंपनीच्या उत्पादन विभागात काम करत असलेल्या कर्मचाऱ्यांना गेल्या ३२ महिन्यांचा पगार आणि इतर सुविधांपासून मुद्दाम प्रलंबित ठेवल्यामुळे कर्मचाऱ्यांनी हा एल्गार पुकारला आहे.

पूर्वीपासून रखडलेले वेतन, परमनंट करणे, पी.एफ, ग्रॅज्युइटी, इ.एस.आय.सी, जीवन विमा, युनिफॉर्म आदी सारख्या अनेक मागण्यासाठी हा आंदोलन केला जाणार असून, याबाबत कंपनी प्रशासन, पोलीस प्रशासन आणि तहसील प्रशासनाला पत्रव्यवहार केले असल्याने कर्मचारी न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत.



याबाबत कंपनी प्रशासनाने ताबडतोब हा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा या शोषण व गैरप्रकारामुळे आमच्या युनियनच्या माध्यमातून कंपनीचे मुख्य अधिकारी व उत्पादन क्षेत्रात जाणारे सर्व अधिकारी कंपनी गेटवर अडवले जातील, अशी सूचना दिल्याची माहिती कॅंटीन कर्मचाऱ्यांनी दिली आहे.

# रोह्यात ज्येष्ठ नागरिक दाम्पत्यांचा सत्कार

**। रोहा । वार्ताहर ।**

रोहा तालुका शासकीय, निमशासकीय सेवानिवृत्त कर्मचारी संघटनेतर्फे १७ डिसेंबर हा पेन्शनर डे समारंभ ज्येष्ठ नागरिक सभागृहात मोठ्या उत्सहात संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून सकल मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष व्ही. टी. देशमुख व प्रमुख मार्गदर्शक अध्यक्ष पी.बी. सरफळे रावसाहेब उपस्थित होते.




१७ डिसेंबर हा पेन्शनर यांच्यासाठी ऐतिहासिक दिवस आहे. याच दिवशी सर्वोच्च न्यायालयाने १९८२ साली पेन्शनरांना पेन्शन देणे हे सरकारचे केवळ औदार्य नसून तो पेन्शनर लोकांचा हक्क आहे, हा निर्णय दिला. त्याच निर्णयाने आपले सर्व पेन्शनर अबाधित राहिले आहेत. आपली पेन्शन बंद होईल याकडे विश्वास ठेऊ नये, असे मौलिक विचार अध्यक्ष पांडुरंग सरफळे यांनी व्यक्त केले.

या वेळी वयाची ७५वर्षे पूर्ण झालेले सुनीता बारस्कर सुरेश चाळके, विठोबा दिघे, साधना वालेकर, मारुती जंगम, मंगला राऊत, अरुणा जाधव, शांताराम महाडिक तसेच वैवाहिक जिवणाची ५० वर्षे पूर्ण केलेले दाम्पत्य शरद गुडेकर, जयराम जाधव, विठोबा दिघे, केशव बागुल, मारुती जंगम, काशिनाथ गोरीवले आणि गजानन खराडे या उभयतांचा शाल, श्रीफळ, गुलाब पुष्प आणि सन्मानचिन्ह प्रदान करून त्यांचा यथोचित सत्कार केला. तसेच गेल्या शैक्षणिक वर्षात शिक्षण मंडळ व विद्यापीठामध्ये सुयश संपादन केले ते आदित्य भोई, इशा पाटील, सिया सरफळे, रोहन सरफळे, आर्या गडमुळे आणि तेजल नील इत्यादी १३विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. भाई व्ही.टी. देशमुख यांनी आपल्या भाषणात संघटनेचे महत्त्व विशद केले.

मारुती राऊत अनंत पाटणकर, शरद गुडेकर, सुधाकर वालेकर, संध्या मळेकर, शैलजा देसाई, सचिव नारायण पाटील, चंद्रकांत गावडे, चंद्रकांत टिकोणे, एस. एन. गायकवाड, भगवान बामुगडे आणि शरद नागवेकर, संजीवनी कडवेकर दिपाली धनावडे अक्षता साखळकर आणि अनुराधा धुमाळ यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन सुरेश मोरे सर यांनी केले.

# गांजा तस्करी रोखण्यात पोलिसांना यश

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत नेरळ राज्यमार्ग रस्त्यावर तीन गाड्यांचा अपघात सकाळी साडे अकरा बारा वाजण्याच्या दरम्यान झाला.त्यावेळी दोन दुचाकी चालक यांच्या भांडण झाले आणि गर्दी जमल्याचे बघून त्यातील एक दुचाकीचालक अन्य सहकाऱ्यांसह पळून जाण्यात यशस्वी ठरला आहे. मात्र घटना स्थळी पोलिसांना सापडलेल्या टीव्हीएस स्कुटी गाडीच्या डिक्कीत गांजा आणि चरस या अमली पदार्थांची पाकिटे आढळून आली आहेत.दरम्यान कर्जत पोलिसांनी अमली पदार्थाची तस्करी करण्याचा प्रकार उधळून लावला असून स्वतःची गाडी टाकून पाळल्याने तरुणाकडे नक्की काय होते? याबाबत पोलीस तपास करीत असून कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

सध्या सुट्ट्या असल्याने पर्यटक हे फिरायला निघाले असून कर्जत कल्याण राज्यमार्ग रस्त्यावर आज सकाळी साडे अकरा बारा वाजण्याच्या सुमारास एक पल्सर,एक टीव्हीएस स्कुटी आणि सिटी होंडा कार या तीन गाड्यांचा कोषाने येथे अपघात झाला. त्यावेळी या तिन्ही गाड्यांचे मालक हे एकमेकांशी भांडू लागले.त्यावेळी गर्दी जमू लागल्यावर पल्सर गाडीवरून दोन तरुण पळून गेले. अपघात झाल्याची माहिती मिळताच कर्जत चारफाटा येथे बंदोबस्त करीत असलेले वाहतूक पोलीस तेथे पोहचले. त्यावेळी कर्जत पोलीस ठाण्यातून आणखी काही पोलीस तेथे पोहचले आणि त्या पोलिसांनी टीव्हीएस स्कुटी गाडीची उघडी असलेली डिकी तपासली असताना गांजा आणि चरस या अमली पदार्थांची काही पाकिटे त्यात आढळून आली. असा प्रकार समोर आल्यावर सिटी होंडा चार चालक याच्या गाडीचे नुकसान झाल्यानंतर कोणतीही भरपाई न मागता तेथून निघून गेला.




**थर्टी फर्स्टसाठी अमली पदार्थ नेले जात असल्याचा संशय**

तर पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या टीव्हीएस स्कुटी गाडी एम एच ०४,के एन ९३५३ या क्रमांकाच्या गाडीच्या डिकीत अमली पदार्थ आढळून आल्याने पोलिसांनी त्या हॅण्डल लॉक करून पळून गेलेल्या तरुणाची वाट न बघता एका टेम्पो मध्ये ती स्कुटी भरून पोलीस ठाण्यात नेण्यात आली.पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कता यामुळे पोलिसांना अमली पदार्थ घेऊन जाणारी गाडी ताब्यात घेता आली आहे.

**पान १ वरून**

## नो सेफ्टी, नो एन्ट्री

राज्य सरकारने ॲक्शन मोडवर येऊन प्रत्येक पॅसेंजर बोटीत संख्येपेक्षा जास्त प्रवासी घेऊ नये तसेच प्रत्येक पॅसेंजरला सेफ्टी जॅकेट घातल्याशिवाय प्रवास करु देऊ नये, असा आदेश शासनाकडून काढण्यात आला आहे. त्या पार्श्वभूमीवर राजपुरी येथील बंदर निरीक्षक सतीश देशमुख यांनी या आदेशाचा पालन करत राजपुरी जेट्टीवरुन आज प्रत्येक बोटीत संख्येनुसार पर्यटकांना सेफ्टी जॅकेट घालून बोटीत प्रवेश दिला जात होता. ज्या बोटीत लहान मुलांना सेफ्टी जॅकेट नसतील, त्या बोटींना परवानगी नाकारल्याने तिकीट कार्यालयाजवळ गोंधळ उडाला आणि पर्यटकांनी नाराजी दर्शवली. काही पर्यटकांनी बंदर निरीक्षकांना घेराव घालून लहान मुलांना सोडण्यास विनंती केली. आमच्या जबाबदारीवर घेऊन जातो. परंतु, बंदर निरीक्षकांनी साफ नकार दिल्याने बंदर निरीक्षकांना पर्यटकांच्या रागाला सामोरे जावे लागले. यावेळी मुरुड पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला.

दरम्यान, काही शालेय विद्यार्थ्यांना जेट्टीवर येऊन किल्ल्याचे फोटो काढून उदास चेहराने परतावे लागले. काही पर्यटकांनी मुरुड समुद्रकिनारी येऊन समुद्राच्या पाण्यात पोहण्याचा आनंद तर कोणी उंटावरून, तर कोणी घोडा गाडीतून तर काहींनी बाईक फिरवण्याचा आनंद घेतला. पर्यटकांच्या आगमनाने शहरासह पंचक्रोशीतील लॉजिंग, हॉटेल, स्टॉलधारक, घरगुती खानावळ तेजीत असून, बऱ्याच महिन्यांनी व्यावसायिक सुखावला आहे.

**बंदर निरीक्षक यांनी काल अचानक आदेश दिले की, प्रत्येक बोटीत संख्येनुसार सेफ्टी नवीन जॅकेट पाहिजेत, तरच तुम्हाला पर्यटकांना किल्ल्यात नेण्यास परवानगी दिली जाईल.ताबडतोब आमच्या काही बोटधारकांनी सेफ्टी जॅकेट आणले. पण, घाईघाईने लहान मुलांचे सेफ्टी जॅकेट आणण्यास विसरले. यामुळे लहान मुलांना किल्ला पाहण्यास बंदर निरीक्षकांनी परवानगी नाकारली. यामुळे शालेय विद्यार्थ्यांसह पर्यटकांना किल्ला न पाहता परतावे लागत असल्याने त्यांनी नाराजी दर्शवली आहे.**

**- शिडाचे बोटधारक**

## गायब ई-रिक्षा माथेरानमध्ये दाखल

माथेरान शहरात पर्यावरणपूरक ई-रिक्षा चालवण्याची परवानगी सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर डिसेंबर २०२२ मध्ये माथेरान पालिकेने सात ई-रिक्षांची खरेदी केली. महिंद्रा कंपनीच्या या रिक्षांच्या माध्यमातून तीन महिन्यांचा पहिला आणि नंतर दुसऱ्या पायलट प्रकल्पामध्ये विद्यार्थी आणि प्रवाशांची वाहतूक केली गेली. १० जूनपासून न्यायायलाने हातरिक्षा चालकांच्या हाती पर्यावरणपूरक ई-रिक्षा देण्याचा निर्णय घेतल्यावर माथेरान पालिकेने खरेदी केलेल्या सात ई-रिक्षा बंद करण्यात आल्या. नंतर त्या सातपैकी पाच ई-रिक्षा या माथेरान पालिकेच्या कम्युनिटी सेंटरमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या, तर अन्य दोन ई-रिक्षा या माथेरान पालिकेच्या बी.जे. रुग्णालयाच्या समोर ठेवण्यात आल्या. त्या दोन ई-रिक्षा गेल्या दोन महिन्यांपासून गायब होत्या. त्याबद्दल माथेरान शहरात उलटसुलट चर्चा सुरु होती. त्यावेळी माथेरान पालिकेचे कार्यालयीन अधीक्षक सदानंद इंगळे हे साततत्याने त्या ई-रिक्षा दुरुस्तीसाठी पनवेल येथील महिंद्रा शोरूममध्ये पाठवण्यात आल्या असल्याचे उत्तर देत होते.

याबाबत कृषीवलचे प्रतिनिधींनी शोधपत्रकारिता करीत त्यातील एका ई-रिक्षेचा शोध घेतला. सदर आर ४ या क्रमांकाची रिक्षा नेरळ गावातील मोहचीवाडी भागात प्रवासी वाहतुकीचा व्यवसाय करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर सदर बातमी सचित्र स्वरूपात आज २५ डिसेंबर रोजी वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली. त्याआधी काळ २४ डिसेंबर रोजी ही बातमी कृषीवलच्या ऑनलाईन एडिशनमध्ये प्रसिद्ध झाल्यावर माथेरान पालिकेच्या अधिकाऱ्यांची भंबेरी उडाली. आज सकाळी माथेरान शहर जागे होण्याच्या आधी ही ई-रिक्षा माथेरान शहरात हजर झाली, त्यामुळे कृषीवलचा दणका महत्त्वाचा ठरला असून, अनेक महिने दुरुस्तीसाठी पनवेल येथे असलेल्या रिक्षा अगदी सकाळी माथेरानमध्ये कशी पोहोचू शकली, असा प्रश्न असून, त्याबाबत रायगड जिल्हाधिकारी यांच्याकडे उद्या रीतसर तक्रार केली जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

## जेएनपीए-मुंबई प्रवास फक्त ३५ मिनिटांत

जेएनपीएने इलेक्ट्रॉनिक बॅटऱ्यांवर चालणाऱ्या प्रदूषणविरहीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर असलेल्या दोन फायबरच्या हलक्या स्पीडबोटी दहा वर्षांच्या कालावधीसाठी पुरवठा करण्याचा प्रस्ताव तयार केला होता. माझगाव डॉक बिल्डर्स लिमिटेड कंपनीने या प्रस्तावाला प्रतिसाद देऊन दोन स्पीड बोटी पुरवठा करण्याची हमी दिली आहे.

## पर्यटकांनी किनारे फुल्ल

अलिबागसह किहीम, मांडवा, वरसोली, मुरुड, काशिद, श्रीवर्धन, दिवेआगर आदी ठिकाणच्या समुद्रकिनाऱ्यांवर पर्यटकांची गर्दी झाल्याचे चित्र आहे. नाताळसाठी गोव्यात जाण्यासाठी मोठा प्रवास आणि खर्च यांच्या तुलनेत रायगडमध्ये जाण्यासाठी खर्च आणि वेळेची बचत होत असल्याने पर्यटकांकडून जिल्ह्यातील किनाऱ्यांना अधिक पसंती देण्यात येत आहे. मोठ मोठ्या हॉटेल्सच्या तुलनेत येथे स्वस्तात दर्जेदार खाद्यपदार्थ, ताजे मासे उपलब्ध होत असल्याची प्रतिक्रिया पुण्याहून अलिबागमध्ये आलेल्या संतोष घरत यांच्या कुटुंबियांनी दिली आहे. दरम्यान, समुद्रकिनाऱ्यांमध्ये फिरण्याचा, पाण्याचा पोहण्याचा व सागरी सफरीचा आनंद पर्यटकांनी मनमुरादपणे घेतला.

नाताळच्या सुट्टीनिमित्त पर्यटक जिल्ह्यामध्ये मोठ्या संख्येने दाखल झाल्याने हॉटेल, रिसॉर्ट, कॉटेज, लॉजींग, पर्यटनावर आधारित असणाऱ्या छोट्या-मोठ्या व्यावसायिकांची चंगळ झाल्याचे दिसून आले. त्यामध्ये स्थानिकांना रोजगाराचे साधन खुले झाले. सकाळपासून जिल्ह्यातील अनेक समुद्रकिनाऱ्यांमध्ये पर्यटकांची गर्दी दिसून आली. काही पर्यटकांनी समुद्रातील पाण्यात पोहण्याबरोबरच बनाना व इतर सागरी सफरीचा आनंद घेतला. काही पर्यटकांनी घोडागाडी, सायकलवर स्वार होऊन समुद्रकिनारी फिरण्याचा आनंद लुटला.

नाताळच्या सुट्टीनिमित्त काही पर्यटक मंगळवारी सायंकाळी अलिबागसह अन्य पर्यटनस्थळी दाखल झाले होते. काही पर्यटक बुधवारी सकाळीच आले होते. काही पर्यटकांनी दिवसभर सुट्टीचा आनंद लुटत सायंकाळी परतीचा मार्ग स्वीकारला. पर्यटकांना त्यांच्या निश्चित स्थळी वेळेवर पोहोचता यावे, यासाठी अलिबाग एसटी बस आगारातून नियमित बसेसबरोबरच अलिबाग-पनवेल विना थांबा ज्यादा बसेस सोडण्याचे नियोजन केले. दुपारपासून अलिबाग स्थानकात पर्यटकांची अफाट गर्दी दिसून आली. पनवेलपर्यंत जाण्याचे तिकीट काढण्यासाठी स्थानकात रांगच रांग लागली होती.

## मिळकतखार अनधिकृत भराव भोवणार

आपल्या स्वयंस्पष्ट कारणमीमांसेसह कांदळवनाची तोड झाली अथवा नाही याबाबत सुस्पष्ट अहवालात नमूद करणेत यावे. तसेच आपले अहवालात (संदिग्धता) राहणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आदेश प्रभारी वन जमाबंदी अधिकारी तथा प्रभारी उपविभागीय अधिकारी अलिबाग श्रीकांत गायकवाड यांनी पारित केले आहेत.

मिळकतखार गट नं. ३९/१, ३९/२, ६९/१, ३४/१, ३४/३, ३७, ८०, ७८, ७४/२, ७०, ७७, ७१, ७२, ६३. ६९/२. ४८. ४९, ३९/४, ४७/२. ५०, ५१,५३, ६०, ५६, ४४, ४५, ४७/१,६८, ३९/३ या मिळकतींमध्ये कांदळवन युक्त सी.आर.झेडच्या तरतुदी लागू असलेल्या जमीन मिळकतीवर झालेल्या अनधिकृत भरावाबाबत वन विभागाकडे तक्रार केली होती. प्रकरणी तक्रार प्राप्त झाल्याबरोबर ४८ तासांच्या आत स्थळ पाहणी करुन कांदळवन तोड झाल्याचे निदर्शनास आल्यास उपविभागीय अधिकारी यांनी पर्यावरण (संरक्षण) अधिनियम १९८६ मधील १५ (१) नुसार एक महिन्याच्या आत न्यायालयात तक्रार दाखल करण्याची कार्यवाही करणे अपेक्षित आहे, असे उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशात नमूद केले आहे.

मिळकतखार येथील अनधिकृत भराव प्रकरण आता धनदांडग्यांसह भराव करणाऱ्यांना चांगलेच महागात पडण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कांदळवन संरक्षणाच्या दृष्टीने प्रशासनाने ही पावले उचलली आहेत. त्यामुळे भराव प्रकरण अडचणीत सापडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## महामार्गावर वाहतूक कोंडी

चारचाकी, एसटी बस, खासगी बसेस, तसेच मिळेल त्या इतर वाहनाने गोव्याकडे निघाले आहेत. यामध्ये भरीत भर म्हणून अपुरे रस्त्यामुळे वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या असून, यामुळे वाहतूक कोंडी निर्माण झाली असल्यामुळे प्रवासी त्रस्त झाले असल्याचे दिसून आले.

मुंबई-गोवा महामार्गावरील पुई महिसदरा नदीच्या पुलापासून कोलाड नाक्यापर्यंत दोन किलोमीटरच्या अंतरावरील रस्ता हा सिंगल असल्यामुळे येथून वाहन चालकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे. येथील रस्त्याची अवस्था अतिशय बिकट असून, यामुळे नागरिकांची मार्ग काढताना तारांबळ उडाली. पुई महिसदरा नदी पुलापासून कोलाड तसेच तळवलीपर्यंत एका बाजूच्या मार्गाचे काम सुरु असून, येणारी-जाणारी वाहतूक दुसऱ्या बाजूने वळविण्यात आली आहे. यामुळे वाहतूक कोंडी निर्माण होत असून, याचा नाहक त्रास प्रवाशांना सहन करावा लागत आहे.

## सायकलवरुन पडून चिमुकल्याचा मृत्यू

प्रशांत विचारे यांचा एकुलता एक मुलगा मिहीर प्रशांत विचारे (९) हा बामणसुरे गावातच सायकल चालवत असताना अचानक तोल जाऊन पडला. काही वेळाने तो आपल्या घरी गेल्यावर अत्यवस्थ झाला, तेव्हा घरातील मंडळींनी त्याला जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले, तेव्हा डॉक्टरांनी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी मुलाला जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यास सांगितले. सदर मुलाला जिल्हा रुग्णालयात उपचारार्थ दाखल करण्यात आल्यानंतर काही वेळाने उपचारादरम्यान प्रतिसाद न मिळाल्याने डॉक्टरांनी शेवटी मृत घोषित केले. त्याच्यावर बामणसुरे स्मशानभूमीत रात्री उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. त्याच्या पश्चात आई, बाबा व इतर परिवार आहे. याबाबत अधिक तपास पोलीस करत आहेत.

## खोपोली शिळफाटा येथे टँकर पेटला

प्रयत्न करीत आगीवर नियंत्रण मिळवण्यात यशस्वी झाले आहेत.मिळालेल्या माहितीनुसार मुंबई-पुणे जुन्या महामार्गावरून केमिकलने भरलेला टँकर मुंबईकडे निघाला होता. बोरघातून खाली उतरून शिळफाट्याच्या काही अंतरावर आला असता वाहनचालका ब्रेक न लागल्याने विद्युतवाहिनीच्या डीपीला धडक दिल्याने टँकर पलटी झाला. सदर वाहनातील अल्कोहोल रस्त्या शेजारील गटारातून वाहत साधारणतः ५०० मीटर अंतरावर गेला आणि भीषण आग लागली. या आगीत रस्त्यावरील एक कार जळली.

आग विझविण्यासाठी खोपोली नगरपालिका, टाटा स्टील, आलाना कंपनी, जेएसडब्ल्यू, गोदरेज, आयआरबी, एमएसआरडीसी देवदूत यंत्रणा या कंपन्यांच्या फायर ब्रिगेड टीमनी आग आटोक्यात आणण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. खोपोली पोलीस, अपघातग्रस्त टीमने रस्त्यावर माती टाकली. अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक संस्थेचे केमिकल एक्सपर्ट आणि टीमनेही केमिकलची तीव्रता पाहून आग विझविण्यासाठीचे मार्गदर्शन केले.

तहसीलदार अभय चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी विक्रम कदम, पोलीस निरीक्षक शीतल राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांच्या प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळवण्यात यश आले. अपघातग्रसत टँकर बाजूला घेत वाहतुक सुरळीत करण्यात आली.

# सेवाज्येष्ठता डावलल्याने पदोन्नतीपासून वंचित

## सा.बां. विभागातील कनिष्ठ अभियंत्यांची ‘मॅट’कडे तक्रार

**। कोर्लई । वार्ताहर ।**

सरकारी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची ज्येष्ठता सूची ही कर्मचारी ज्या तारखेला शासन सेवेत रुजू होतो त्या दिनांकापासूनच दिली जाते, हा नियम आहे व तसेच शासनाचे नियम व जीआर आहेत. परंतु, ज्येष्ठता सूची तयार करताना अर्थपूर्णरित्या व्यवहार झालेला असल्याची चर्चा ऐकावयास मिळते आहे. या चुकीच्या ज्येष्ठता सूचीला काही अन्याय झालेल्या अभियंत्यांनी मॅटमध्ये आव्हान दिले आहे. यापैकीच एका प्रकरणात मॅटमध्ये सुनावणी होऊन ही चुकीची ज्येष्ठता सूची रद्द करून आठ आठवड्यात नियमांनुसार ज्येष्ठता सूची तयार करण्याचे आदेश मॅट ने दि.११ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या निर्णयाने दिलेले आहेत. या निर्णयामुळे ज्येष्ठता सूचीसारख्या कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयामध्ये गडबड करणाऱ्यांना मॅटने जोरदार चपराक दिली आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागातील कनिष्ठ अभियंत्यांचीसुद्धा ज्येष्ठता सूची तयार केलेली होती. जुलै २०२२ पर्यंत कनिष्ठ अभियंत्यांची ज्येष्ठता सूची नियमानुसार व प्रत्यक्ष कामावर रुजू दिनांकानुसार बनविण्यात आलेली होती व त्याप्रमाणे ती प्रसिद्ध करण्यात आली होती. परंतु, फेब्रुवारी २०२३ ला अचानक या ज्येष्ठता सूचीमध्ये गडबड करून रुजू दिनांकानुसार ज्येष्ठता सूची तयार न करता मर्जीतील काही ठराविक अभियंत्यांना सहा महिने ते साडेतीन वर्षांपूर्वीचा सेवेत नसतानाचा व कोणत्याही सक्षम अधिकाऱ्याची मान्यता नसलेला मानीव दिनांक देऊन सेवा कनिष्ठ असणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांना सेवाज्येष्ठ करण्यात आले. ही चुकीची ज्येष्ठता सूची तयार करताना अर्थपूर्णरित्या व्यवहार झालेला असल्याची चर्चा ऐकावयास मिळते आहे. या चुकीच्या ज्येष्ठता सूचीला काही अन्याय झालेल्या अभियंत्यांनी मॅटमध्ये आव्हान दिले आहे.

> **माझे नाव पदोन्नतीकरिता २०२२ यावर्षीच होते. परंतु, या चुकीच्या सिनॅरिटीमुळे २०२२ ते २०२४ असे दोन वर्षे मला पदोन्नतीपासून डावललं गेल होतं. या ‘मॅट’च्या निर्णयामुळे माझ्यासारखाच अन्याय झालेल्या शेकडो शाखा अभियंत्यांना न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.**
> **– यू.एस.राठोड, शाखा अभियंता, सा.बां.उपविभाग मुरुड–जंजिरा, रायगड**

यापैकीच एका प्रकरणात मॅटमध्ये सुनावणी होऊन ही चुकीची ज्येष्ठता सूची रद्द करून आठ आठवड्यात नियमांनुसार ज्येष्ठता सूची तयार करण्याचे आदेश मॅट ने दि.११ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या निर्णयाने दिलेले आहेत. या निर्णयामुळे ज्येष्ठता सूचीसारख्या कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या विषयामध्ये गडबड करणाऱ्यांना मॅटने जोरदार चपराक दिली आहे. आता नियमांनुसार व रूजु दिनांका नुसारच ज्येष्ठता सूची तयार करून कनिष्ठ अभियंत्यांना न्याय मिळावा व चुकीची ज्येष्ठता सूची तयार करणाऱ्या प्रशासनातील अधिकाऱ्यांवर योग्य ती कार्यवाही व्हावी. ही २५ वर्ष पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या कनिष्ठ अभियंत्यांची माफक अपेक्षा आहे. आणि त्याप्रमाणे आतातरी प्रशासन योग्य तो निर्णय घेईल ही अपेक्षा आहे. एका अर्थाने झालेली चुक दुरूस्त करण्याची प्रशासनास संधी आहे.

# जेएनपीटीमधील कामगारांना भरघोस पगारवाढ



**। उरण । वार्ताहर ।**

जीटीआय कंपनीमध्ये आरटीजी मेंटेनन्स डिपार्टमेंट मधील महेश ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत शिवतेज संघटना युनियनमार्फत तीन वर्षांकरिता ॲग्रीमेंट साईन झाला आहे, यामध्ये सर्व कामगारांना १९ हजार रुपये पगारवाढ, मेडिकल पॉलिसी अडीच लाखांवरुन तीन लाख करण्यात आली व इतर भत्ते वाढवण्यात आले आहेत. या करारामुळे कामगारांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

जेएनपीटीमधील एक महत्त्वाचे बंदर म्हणजे जीटीआय मध्ये आरटीजी मेंटेनन्स मध्ये काम करणारे कर्मचारी हे माजी आमदार मनोहरशेठ भोईर यांच्या शिवतेज संघटनेचे सभासद आहेत.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष माजी आमदार श्री मनोहरशेठ भोईर, महेश ग्लोबल प्राइवेट लिमिटेड चे अध्यक्ष श्री कावळे, कामगार प्रतिनिधी जगदीश भोईर, संतोष भोपी, सतीश सुतार, दीपक पाटील व मंगेश पाटील उपस्थित होते.

# विद्यार्थिनींसाठी बॅंकिंग परीक्षासंबंधी व्याख्यान

**श्रीवर्धन :** महर्षी कर्वे आदर्श महिला महाविद्यालय, श्रीवर्धन येथे बॅंकिंग परीक्षा या विषयांवर ऑनलाईन पद्धतीने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून पुणे येथील डॉ. विठ्ठल कावेरी (माजी प्राध्यापक आणि अधिष्टता NIBM, पुणे) उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पांडुरंग राणे होते. तसेच या कार्यक्रमाचे संयोजन व प्रास्ताविक महाविद्यालयातील प्रा. डॉ. योगेश लोखंडे यांनी केले. विद्यार्थिनींना डॉ. विठ्ठल कावेरी यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. दत्तात्रय पांडुरंग राणे यांनी विद्यार्थिनींनी बॅंकींग क्षेत्राकडे का वळावे याबद्दल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सहा. प्राध्यापक डॉ. योगेश लोखंडे यांनी केले. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाला विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

निवडक

## चुंबक निसर्गोपचार शिबीर

**उरण :** महाराष्ट्र ग्रामीण आरोग्य सेवा संस्था नागपूर ई.डब्लू.डी.२३७ व फ्रेंड्स सर्कल सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळ उरण कोटगाव यांच्या संयुक्त विद्यम ाने कोटनाका येथील फ्रेंड्स सर्कल पटांगणावर मोफत चुंबक निसर्गोपचार शिबिराचे आयोजन दि.१८ ते ३१ डिसेंबरपर्यंत सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत ठेवण्यात आले आहे. या शिबिरात लकवा, पोलिओ, दमा, बीपी, नेहमीची सर्दी, हृदय विकार, डायबेटीज, वात, कार, पोटाचे विकार, कंबरदुखी, कान, नाक, घसा अश्या असाध्य रोगांवर उपचार केले जात आहेत.

## मुरूडमध्ये ग्राहक दिन साजरा

**मुरुड जंजिरा :** मुरुड तालुक्यातील सर्व रेशनिंग दुकानदारांच्या समवेत ग्राहक दीन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष तहसीलदार रोहन शिंदे हे होते. यावेळी मुरुड तालुका स्वस्त धान्य दुकानदार संघटनेचे अध्यक्ष अजित बाळकृष्ण कासार हे विशेष उपस्थित होते. ग्राहक दिनाच्या कार्यक्रमास नायब तहसीलदार राजश्री साळवी, मुरूड तालुका माजी सभापती किशोर धामणस्कर, धान्य दुकानदार महेंद्र आंबटकर, माजी नगरसेवक पांडुरंग आरेकर, संदिप कमाने, तसेच ग्राहक उपस्थीत होते.

## ट्रेनमधून महिलेच्या बॅगेची चोरी

**पनवेल :** तळोजा रेल्वे स्थानकात थांबलेल्या ट्रेनमध्ये घुसून अज्ञात व्यक्तीने एका महिला प्रवाशाची बॅग चोरून पलायन केल्याची घटना घडली आहे. जागृती परब या त्यांच्या कुटुंबियांसह मंगळुरु जंक्शन स्पेशल एक्सप्रेसने प्रवास करत होत्या. ही गाडी मध्यरात्रीच्या सुमारास तळोजा रेल्वे स्थानकाजवळ क्रॉसिंगसाठी थांबली असताना त्यांच्या बोगीमध्ये चढलेल्या अज्ञात चोरट्याने त्यांची बॅग लांबविली. या बॅगेमध्ये सोनसाखळी, मोबाईल फोन, आधारकार्ड व इतर महत्वाच्या वस्तू होत्या.

## एका व्यक्तीची फसवणूक

**पनवेल :** कामोठे येथे राहणाऱ्या ४० वर्षीय व्यक्तीशी एका सायबर चोराने संपर्क साधून एका बँकेच्या क्रेडीट कार्ड डिपार्टमेंटमधील कर्मचारी असल्याचे भासविले. त्यानंतर आरोपीने त्यांना क्रेडीट कार्डवर जास्त सेवा कर आकारण्यात येत असल्याचे सांगितले. तसेच, हे कर कमी करण्यासाठी त्यांना बँकेचे ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्याने व्हॉटसअपवर लिंक पाठवून दिली. या लिंकद्वारे बँकेचे ॲप डाऊनलोड करताच क्रेडीट कार्डवर परस्पर १ लाख ६४ रुपये किंमतीचे व्यवहार झाले.

## वृद्धांना ब्लँकेट वाटप

**पनवेल :** महाराष्ट्रीयन बिल्डरचे सरचिटणीस तुकाराम दुधे यांनी आपल्या माता पित्याच्या पुण्यतिथी निमित्त नेरा येथील स्नेहकुंज आधारगृहातील वृद्धांना भोजनदान व ब्लँकेट वाटप करण्यात आले. या कार्यक्रम ाला तुकाराम दुधे, सुरेखा दुधे, विकी दुधे, जोत्सना दुधे, दिपीका दुधे, मिहीर देशपांडे आदी उपस्थित होते. यावेळी प्रमोद वरोकार, प्रदीप ठाकरे, सिद्धाराम भालेराव, शंकर वायदंडे, गणपत वारगडा, संविधान वाघमारे आदींसह नितीन जोशी, संगीता जोशी आणि दुधे यांचा कर्मचारी वर्ग उपस्थित राहून वाटप करण्यात आले.

# हजारो लीटर पाणी वाया

## पाणी पुरवठा विभागाचे दुर्लक्ष; नागरिकांचा आरोप

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

**रायगड जिल्ह्यात पाणी टंचाईची समस्या भेडसावत असताना अलिबाग तालुक्यातील बेलोशी-महाजने रस्त्यावरील पाण्याच्या पाईपलाईनला गळाती लागली आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून लागलेल्या या गळतीमुळे हजारो लिटर पाणी वाया जात आहे. याकडे बेलोशी ग्रामपंचायतीसह ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रीया या रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या नागरिकांकडून उमटत आहे.**

अलिबाग तालुक्यातील महाजने या गावाला उमटे धरणातून पाणी पुरवठा केला जातो. एक हजारहून अधिक लोकसंख्या असलेल्या या गावामध्ये पाईपलाईनद्वारे पाणी पुरवठा केला जातो. यातील काहींनी वैयक्तीक नळ जोडण्या घेतल्या आहेत. तर, काहींना सार्वजनिक नळाद्वारे पाणी पुरवठा केला जात आहे. परंतु, गेल्या अनेक महिन्यांपासून बेलोशी-

महाजने रस्त्यावरील पाण्याची पाईपलाईनला दोन ठिकाणी गळती लागली आहे. त्यामुळे नेहमी हजारो लिटर पाणी वाया जात आहे. परंतु, गळती लागलेले पाईप दुरुस्त करण्यास ग्रामपंचायत व ग्रामीण पाणी पुरवठा विभाग दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. तसेच, जानेवारी महिना उजाडल्यावर पाणी कपातीचे संकट उभे राहणार आहे. पाणी जपून वापरा असे आवाहन देखील ग्रामीण पाणी पुरवठा विभागासह बेलोशी ग्रामपंचायतीकडून केले जाणार आहेत. परंतु, रस्त्यावरच गळती लागलेल्या पाईप लाईनमुळे हजारो लिटर पाणी वाया जात असताना त्याकडे मात्र दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया स्थानिकांकडून उमटत आहेत.



जिल्ह्यातील अनेक भागात पाण्यासाठी एक ते दोन किलो मीटर पायपीट करावे लागत आहे. काहींना विकत पाणी आणावे लागत आहे. ही परिस्थिती असतानादेखील बेलोशी महाजने रस्त्यावरील वाया जाणाऱ्या पाण्याकडे दुर्लक्ष का, असा सवाल उपस्थित केला जात आहे. याबाबत कृषीवल प्रतिनिधीने गावातील काही स्थानिकांशी संपर्क साधला असता, ते म्हणाले की, गावापासून शंभर मीटर अंतरावरील पाईपलाईनला संबधित विभागातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे गळती लागली आहे. त्याची समस्या अजूनही त्यांना मिळाली नाही. त्यामुळे पाणी वाया जात आहे. याकडे संबंधित विभागाने लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे. याबाबत ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपअभियंता चवरकर यांच्याशी संपर्क साधला असता, तो होऊ शकलेला नाही.

> **महाजने गावाला उमटे धरणाद्वारे पाणी पुरवठा केला जातो. पाण्याची योजना ग्रामीण पाणी पुरवठा विभागामार्फत राबविली जात आहे. महाजने-बेलोशी रस्त्यावरील गळती लागलेल्या पाईपलाईनची दुरुस्ती करण्याची मागणी ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे केली जाईल. हा प्रश्न तातडीने सोडविण्याचा प्रयत्न करून वाया जाणारे पाणी थांबविण्याचा प्रयत्न ग्रामपंचायतीमार्फत केला जाईल.**
> **- शैलेश नाईक, ग्रामविकास अधिकारी, बेलोशी**




# प्रिया चौधरी पुरस्काराने सन्मानित

**। उरण । वार्ताहर ।**

शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्या बद्दल प्रिया सुनिल चौधरी यांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. उरण बोकडविरा येथे द्रोणागिरी स्पोर्टस असो.तर्फे रायगड जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना त्यांचा कार्याचा गौरव करत द्रोणागिरी भूषण पुरस्कार देऊन त्यांना गौरव करण्यात आला आहे. या प्रसंगी आदर्श शिक्षिका प्रिया सूनिल चौधरी यांना द्रोणागिरी भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी द्रोणागिरी स्पोर्टस असो.चे संस्थापक महादेव घरत, ॲड. रणजित जाधवराव, मिलिंद खारपाटील, शिवराज पार्टे, नीलेश कोळसकर, दिपक शेलार, मनोहर गोळे, आदेश केसरकर, एस.सी. मिश्रा, पुंडलिक म्हात्रे, वैशाली घरत, ब्रह्मा कुमारी उज्वला दीदी आदी मान्यवर उपस्थित होते.

# पोलादी कॉईलमुळे अपघाताचा धोका



**। नागोठणे । वार्ताहर ।**

नागोठण्याजवळील सुकेळी गावाकडे जाणाऱ्या रस्त्याच्या समोरील मुंबई-गोवा महामार्गावर पडलेल्या दोन पोलादी कॉइलमुळे वाहनांना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या दोन कॉइल तातडीने उचलाव्यात, अशी मागणी वाहन चालक व नागरिकांतून होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, डोलवी येथील जे.एस.डब्ल्यू कंपनीतून विले-भागाड येथील पोस्को स्टील कंपनीमध्ये सोमवारी (दि.२३) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास पोलादी कॉइल घेऊन जाणाऱ्या ट्रेलर चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने ट्रेलर महामार्गालगत पलटी झाला होता. म हामार्गावरील वाहतुकीला अडथळा नको म्हणून वाहतूक पोलिसांनी हा ट्रेलर घटनास्थळावरून तातडीने हलविला होता. मात्र, त्याचवेळी या ट्रेलरवरून पडलेल्या दोन पोलादी कॉइल मात्र अद्यापही महामार्गालगत साईड पट्टीवर तशाच पडून असल्याने महामार्गावरून येणाऱ्या जाणाऱ्या वाहनांना अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. वाहतूक पोलिसांनी यावर तातडीने कारवाई करून उपाययोजना करण्याची गरज निर्माण झाली आहे.




● नाताळनिमित्त अलिबागमधील नाझरेथ चर्चमध्ये ख्रिस्ती बांधवांकडून एकत्र येत प्रार्थना करण्यात आली. (छायाचित्र- समीर मालोदे)

## आंबेवाडी ग्रामसभेत आंदोलनाचा इशारा

**। रोहा । वार्ताहर ।**

तालुक्यातील आंबेवाडी ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत ग्रामस्थांनी आक्रमक भूमिका घेत मुंबई- गोवा महामार्गावर असलेल्या शासकीय आंबेवाडी प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपलब्ध नसल्याने शासनाकडून तातडीने डॉक्टर उपलब्ध व्हावे, अशी मागणी केली आहे. तसेच, मुंबई-गोवा महामार्गावर सद्या उड्डाण पुलाचे काम सुरु आहे. भविष्यात पुराचा धोका टाळण्यासाठी हा पूल बंदिस्त न बांधता आरसीसी खांबावर बांधण्यात यावे, अशा पद्धतीचे महत्वाचे ठराव पारीत करण्यात आले. तसेच, या पुला जवळील सर्व्हिस रोडचे काम पक्के न झाल्यास संतप्त ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे. एकंदरीत भर थंडीत पार पडलेल्या ग्रामसभेत गरम गरम चर्चा करून संबधित प्रशासनाला ग्रामस्थांकडून इशारा देण्यात आला आहे.

# सुरक्षा रक्षकांना धमकावून चोरी

**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल तालुक्यातील शिरढोण येथे जवळपास ५ कोटी रुपये किंम तीच्या सुपारी व मिरीच्या मालाची तेथील सुरक्षा रक्षकांना धमकावून अज्ञात टोळीने चोरी केल्याची घटना घडली आहे.

आशेरा वेअर हाऊस शिरढोण येथील आलसेन शिपींग ॲण्ड लॉजिस्टीक्स प्रा.लि. कंपनीच्या गाळ्यामध्ये कस्ट विभागाकडून कस्टम ड्युटी न भरलेला तीन कंपनींच्या सुपारी व मिरी असा माल ठेवण्यात आला होता. दरम्यान, या ठिकाणी १ ट्रेलर कंटेनरसह ४ लहान ट्रक व सुमारे ३० ते ३५ इसम तेथे आले होते. त्यातील एकाने तेथील सुरक्षा रक्षकांला चाकू दाखवून जीवे मारण्याची धमकी देऊन त्यांचे हातपाय बांधले. तसेच, कटर मशिनच्या सहाय्याने गाळ्याच्या शटरला असलेली कुलूपे तोडून आत प्रवेश करून जवळपास ५ कोटी रुपये किंमतीच्या सुपारी व मिरी हा माल व सुरक्षा रक्षकाचा मोबाईल चोरुन ते पसार झाले आहेत. या घटनेची नोंद पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून या गुन्ह्यातील आरोपींचा शोध सुरू आहे.

## मैत्री महोत्सवाचे आयोजन

**नेरळ ।** सामाजिक-आध्यात्मिक संस्था मैत्रीबोध परिवाराच्या माध्यमातून २७ डिसेंबर रोजी कर्जत येथे जागतिक मैत्री महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात जगभरातील आध्यात्मिक सबलीकरण, ग्रामीण विकास आणि पर्यावरण संवर्धनासाठी वचनबद्ध होण्यासाठी हजारो लोक एकत्र येणार आहेत. दरवर्षी हा दिवस अध्यात्म, सामाजिक जबाबदारी आणि जागतिक एकात्मतेला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने साजरा केला जातो. २०१९ पासून हा महोत्सव साजरा केला जात असून या वर्षीच्या कार्यक्रमात 'मैत्री आदर्श ग्राम', 'पृथ्वी आलिंगन' आणि 'चिंता-मुक्त भारत' यासारखे प्रकल्प प्रदर्शित केले जाणार आहेत.

# इमेज कॅलेंडरमध्ये अवतरली पुरातन मंदिरे

## बारा छायाचित्रकारांच्या छायाचित्रांची निवड

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

जिल्ह्यातील हौशी व व्यावसायिक छायाचित्रकारांच्या कलेला वाव देण्यासाठी इमेज कॅलेडरने सात वर्षाची परंपरा जपली आहे. यंदाही २०२५ चे इमेज कॅलेंडर वेगळ्या रुपात तसेच निसर्गाने नटलेल्या पुरातन मंदिरांच्या छायाचित्रांची छबी दिसणार आहेत. जिल्ह्यातून प्राप्त झालेल्या शेकडो छायाचित्रांमधून १२ छायाचित्रांची निवड या कॅलेडरमध्ये करण्यात आली आहे. हे कॅलेडर लवकरच नागरिकांच्या भेटीला येणार आहे.

अलिबागमधील छायाचित्रकार रमेश कांबळे, जितू शिगवण आणि समीर मालोदे यांच्या संकल्पनेतून तयार झालेल्या इमेज कॅलेडरचे यंदा सातवे वर्ष आहे. दरवर्षी वेगवेगळ्या प्रकारची आकर्षक अशी पर्यटन व निसर्गाने नटलेल्या परिसराची छायाचित्र या कॅलेंडरच्या माध्यमातून नागरिकांना पहावयास मिळत आहेत.

यावर्षी इमेज कॅलेडरमध्ये निसर्गाने नटलेल्या पुरातन मंदिरांचा समावेश करण्यात आला आहे. या कॅलेडरमध्ये आपली छायाचित्रे यावीत यासाठी जिल्ह्यातील हौशी व व्यावसायिक छायाचित्रकारांकडून छायाचित्रे मागविण्यात आली होती. शेकडो स्पर्धकांनी छायाचित्रे पाठविली होती.परीक्षकांच्या माध्यमातून या छायाचित्रांची पडताळणी करण्यात आली.

यामुळे २०२५ च्या इमेज कॅलेंडरमध्ये अलिबागमधील वैभव शिंदे, खंडाळेमधील पंकज गोंधळी, महाडमधील कल्पेश पाटील, अलिबागमधील सचिन आसरानी, पालीमधील नितीन शिर्के, माणगांव-नांदवीमधील प्रफुल्ल पवार, वरसोली येथील परिणिती कांबळे, महाडमधील प्रीतम सकपाळ, पेणमधील समाधान पाटील, खोपोलीमधील अविनाश राऊत, ढवरमधील निलेश पाटील, मुरूड-एकदरा येथील भारत रांजणकर यांच्या छायाचित्रांची निवड करण्यात आली आहे. लवकरच हे कॅलेडर नागरिकांच्या घरातील भिंतीवर दिसणार आहेत.

# बेकायदेशीररित्या विक्रेत्यांना पालिकेचे अभय



**। पनवेल । वार्ताहर ।**

पनवेल शहरासह नवीन पनवेल, खांदा वसाहत, कामोठे, खारघर, कळंबोली आदी विभागात बेकायदेशीररित्या नारळ पाणी तसेच फळ विक्री करणाऱ्या परप्रांतीयांवर पनवेल महानगरपालिका अतिक्रमण विभाग कारवाई का करत नाही, असा सवाल येथील स्थानिक रहिवाशी करीत आहेत.

शहरातील उपजिल्हा रुग्णालय परिसरात, तालुका पोलीस स्टेशन समोर, तहसील कार्यालयाजवळ तसेच शहरातील विविध रुग्णालये, नारायण स्वामी मंदिराजवळ, प्राचीन हॉस्पिटल परिसरात, वडाळे तलाव परिसरात, नवीन कोर्टासमोर मोठ्या प्रमाणात परपराज्यातून आलेले नारळ पाणी विक्रेते आपले बस्तान मांडून बसले आहेत. गेल्या काही दिवसांपासून पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून अतिक्रमण तोड मोहिम जोरदारपणे सुरू असल्याने त्याचे स्वागत पनवेलकरांनी केले आहे. परंतु, ही अतिक्रमण मोहिम राबविताना संबंधित अधिकारी वर्ग हे दुजाभाव करताना दिसून येत आहे. अनेक ठिकाणी स्थानिक लोकांच्या व्यवसायावर कारवाई करण्यास येत आहे. परंतु, परराज्यातून आलेले व्यावसायिक आपला धंदा बिनधास्तपणे व सर्वांच्या डोळ्यादेखत करीत असताना त्यांच्यावर कारवाई का होत नाही, असा सवाल पनवेलवासिय करीत असून पनवेल महापालिकेने या परप्रांतीय व्यावसायिकांवर सुद्धा कारवाई करावी, अशी मागणी जोर धरु लागली आहे.

**पाहिजेत**

**वामन हरी पेठे ज्वेलर्स अलिबाग शाखेसाठी पाहिजेत.**

**सेल्स एक्जिक्युटिव**
पात्रता : कोणत्याही शाखेचा पदवीधर

**शिपाई**
पात्रता : SSC, अनुभव असल्याप्राधान्य.

**प्रत्यक्ष भेटण्यासाठी रविवार दिनांक २९/१२/२०२४**
**वेळ : सकाळी ११ ते ४ वाजेपर्यंत.**
**संपर्क : (०२१४१)२२१४७७/९९६०५४२६१३**

## आरसीएफ कंपनीने जपली सामाजिक बांधिलकी

# मासळी विक्रेत्यांना शीतपेट्यांचा आधार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



समुद्रातील मासळी खराब होऊ नये, ती सुस्थितीत राहवी यासाठी थळमधील आरसीएफ कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत परिसरातील महिलांना शीतपेट्या दिल्या आहेत. कंपनीने सामाजिक बांधिलकी जपत दिलेल्या शितपेट्यांचा मासळी विक्रेत्या महिलांना आधार मिळाला आहे. मासळीचे उत्पादन ताजे आणि सुरक्षित ठेवण्यासाठी शितपेट्या फायदेशीर ठरत असल्याचे यावेळी महिलांनी स्पष्ट केले आहे.

मच्छीमार जीवाची पर्वा करीत खोल समुद्रात मासेमारी करत असतात. परंतु, मासळी सुरक्षीत ठेवण्यासाठी शीत पेट्यांचा अभाव कायमच आला आहे. त्यामुळे अनेकवेळा मासळी खराब झाल्याने मासळी विक्रेत्या महिलांचे मोठे आर्थिक नुकसान होते. ही समस्या सोडविण्यासाठी थळमधील आरसीएफ कंपनीने पुढाकार घेतला आहे. थळ मच्छीमार सहकारी सोसायटी लि. आणि नवेदर नवगाव बोरेश्वर सर्वोदय सहकारी सोसायटी लि. यांच्या मागणीनुसार, सुमारे १ हजार मच्छीमार महिलांना मासळी व्यवसायासाठी शितपेट्यांची आवश्यकता होती. या मागणीनुसान आरसीएफ प्रशासनाने बांधिलकी मासळीचे उत्पादन ताजे आणि सुरक्षित ठेवण्यासाठी, उत्पादकता वाढवण्यासाठी आणि त्यांच्या जीवनशैलीमध्ये सुधारणा करण्यासाठी आरसीएफ थळद्वारे सीएसआर उपक्रमांअंतर्गत १ हजा शीतपेट्यांचे वितरण करण्यात आले.

> **सीएसआरच्या माध्यमातून सामाजिक दृष्टीकोन ठेवत समाजाच्या विविध घटकांना मदत करण्यासाठी आरसीएफ सातत्याने प्रयत्नशील आहे. महिला सशक्तीकरणासाठी आणि त्यांना यशस्वी जीवन जगण्यासाठी आरसीएफने आपली भूमिका प्रगल्भपणे पार केली आहे. आपल्याला विश्वास आहे की या शीतपेटीमुळे या महिला मच्छिमारांच्या जीवनात एक महत्त्वपूर्ण बदल घडेल आणि ते अधिक आत्मविश्वासी होऊन आपला व्यवसाय आणि कुटुंब चालवू शकतील.**
> **- नितिन हिरडे, कार्यकारी संचालक (थळ) आरसीफ प्रकल्प**

कंपनीलगत असलेल्या शेतकरी प्रशिक्षण केंद्रात शीतपेट्या वाटपाचा सोहळा कार्यकारी संचालक नितिन हिरडे आणि महाव्यवस्थापक संजीव हरळीकर यांच्या प्रमुख उपस्थित झाला. यावेळी उपमहाव्यवस्थापक विनायक पाटील, उपमहाव्यवस्थापक उदय चव्हाण, मुख्य प्रशासकीय व्यवस्थापक महेश पाटील, कॉर्पोरेट सीएसआर सल्लागार धनंजय खाम कर, वरिष्ठ व्यवस्थापक सीएसआर हर्षला शिंदे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी राकेश कवळे यांच्यासह मच्छीमार सोसायट्यांचे पदाधिकारी व लाभार्थी मच्छीमार महिला उपस्थित होते.

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)



# प्रश्न पास-नापासाचा नाही

नवव्या यत्तेपर्यंत मुलांना सरसकट वर ढकलण्याचा निर्णय आता बदलण्यात आला आहे. मनमोहनसिंग सरकारच्या काळात २००९ मध्ये मूळ निर्णय घेण्यात आला होता. त्यानुसार पाचवी आणि आठवी या वर्गांमध्ये नापास झालेल्या मुलांना देखील वरच्या वर्गात ढकलावे असे सरकारने सांगितले होते. एका विशिष्ट परिस्थितीत हा निर्णय झाला होता. पहिली ते चौथीच्या दरम्यान सुमारे तीस टक्के, सातवीनंतर चाळीस टक्के आणि नववी-दहावीमध्ये सुमारे ५४ टक्के मुले शिक्षणातून बाहेर पडतात असे एका सर्वेक्षणात आढळले होते. म्हणजे पहिलीत दाखल होणाऱ्या दर शंभर मुलांपैकी केवळ तीस-चाळीस मुलेच दहावीत जात होती. एकदा मूल नापास झाले की त्याचा व त्याच्या पालकांचा शिक्षणातील रस संपतो. मुलाला शाळा जमणारच नसेल तर त्याने किमान घरी, शेतीमध्ये किंवा इतर कामाधंद्यात हातभार लावावा असे त्यांना वाटू लागते. त्यामुळे मग मुलांचे शिक्षण संपते. शंभर वर्षांपूर्वी अक्षरओळखही नसलेल्या अनेक जणांनी उद्योग, व्यवसाय, राजकारण इत्यादी क्षेत्रात मोठे काम केले. पण तो काळ वेगळा होता. आजच्या डिजिटल युगामध्ये शाळा सोडून बसलेल्या मुलांना फार मोठ्या संधी मिळणे दुरापास्त असते. त्यातून समाजात असमतोल निर्माण होतो. एकीकडे संगणक आणि इतर क्षेत्रात मोठी कामगिरी करणारा शिक्षित समाज आणि दुसरीकडे हा अशिक्षित समाज यांच्यात दरी निर्माण होते. आर्थिक विषमता तयार होते. त्यावर इलाज म्हणजे शिक्षणाचा प्रसार वाढवणे. त्यासाठी मुलांना काहीही करून शिक्षणाच्या व्यवस्थेत ठेवणे हे महत्वाचे मानले गेले. त्यातूनच मुलांना वर ढकलत ठेवावे हा निर्णय जन्माला आला. शाळेच्या प्रवाहात राहिलेली मुले पुढे आपल्या अपुरेपणावर मात करतील हे यातले गृहित होते. शिवाय, अभ्यासात मागे असलेल्या मुलांवर विशेष मेहनत घेऊन शिक्षकांनी त्यांना इतरांच्या बरोबरीला आणावे हेही अपेक्षित होते.

### शिक्षक म्हणजे हमाल नव्हे

भारतात एका चांगल्या उद्दिष्टाने घेतलेल्या निर्णयाचे तात्काळ वांगे होण्यास वेळ लागत नाही. त्यानुसार येथेही घडले. काहीही झाले तरी मुले वरच्या वर्गात जाणारच आहेत हे लक्षात येताच शिक्षक, मुले, पालक या सर्वांमध्येच एक शिथिलता आली. त्याचा मोठा दुष्परिणाम शिक्षणाच्या दर्जावर झाला. भाषा लिहिता व वाचता येणे किंवा अंकगणित करता येणे या साध्या कसोट्यांनाही मुले उतरत नाहीत हे असरच्या सर्वेक्षणांमध्ये दिसू लागले. आठवी, नववीतील मुलांना चार ओळी नीट वाचता येत नाहीत किंवा लिहिताही येत नाहीत अशी आज बहुसंख्य ठिकाणची स्थिती आहे. याची जाणीव झाल्यामुळेच हे ढकलगाडीचे धोरण बंद करावे अशी शिक्षणतज्ज्ञांची व राज्य सरकारांची मागणी होती. ती अखेर केंद्राला मान्य करावी लागली आहे. महाराष्ट्र सरकारने पूर्वीच हा निर्णय घेतला होता. मात्र या निमित्ताने आपल्या शिक्षण पद्धतीचा समग्र विचार करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. आज राज्यातील शाळांमध्ये परीक्षा होत असल्या तरी त्यांचा व एकूण शिक्षणाचा दर्जा चिंताजनक आहे. मुळात शिक्षक या घटकावर कामाचे असंख्य प्रकारचे बोजे टाकण्यात येतात. पोषण आहारासाठी खिचडी करणे, त्यांचे हिशेब ठेवणे, विद्यार्थ्यांची ऑनलाईन माहिती भरण्यासाठी डेटाएन्ट्री करणे, साक्षरता, हागणदारीमुक्त गाव इथपासून वाटेल त्या प्रकारची सर्वेक्षणे करणे, जनगणना, निवडणुका अशी काय वाटेल ती कामे शिक्षकांना सांगितली जातात. सध्या तर विविध उपक्रम करून नंतर त्यांचे फोटो व व्हिडियोमोबाइलवरअपलोड करण्याची टूम निघाली आहे. विद्यार्थ्यांना स्वच्छतेची प्रतिज्ञा द्यायची आणि पुढच्या तासाभरात त्याचा व्हिडिओअपलोड करायचा असे उपद्व्याप शिक्षकांना करावे लागतात. यामध्ये त्यांचे जे मूळ काम शिकवणे त्यासाठी त्यांना पुरेसा वेळ देता येत नाही. म्हणून तर, अनेक शिक्षक संघटनांनी आम्हाला शिकवू द्या असे आंदोलन केले होते.

### क्षमता सुधारायला हवी

शिक्षक हा गाव किंवा तालुका पातळीवरचा एक हक्काचा हमाल आहे ही सरकारची त्याकडे पाहण्याची भूमिका आहे. ती त्वरीत बदलायला हवी. सरकारनेच शिकवण्याचे महत्व दुय्यम करून टाकल्याने या व्यवस्थेत अनेक बनेल शिक्षक घुसले आहेत. हे लोक शाळेच्या गावात न राहता तालुक्याच्या गावाला राहतात. शिकवण्यापेक्षा शेती, जमीन खरेदी-विक्री किंवा इतर उद्योग करतात. वरचे अधिकारी व राजकारणी यांना खूष ठेवून नोकरी कायम राहील असे पाहतात. यात विद्यार्थ्यांचे नुकसान होते. अंतिमतः याचा फटका समाजालाच बसत असतो. पण या व्यवस्थेच्या कारभाऱ्यांच्या हे लक्षात येत नाही. काही निष्ठावान शिक्षक या स्थितीतही मुलांवर मेहनत घेतात. विज्ञान प्रदर्शने, विविध स्पर्धा, शिष्यवृत्ती परीक्षा इत्यादींसाठी मुलांची तयारी करून घेतात. पण बहुतेकदा हे उपक्रम हुशार मुलांपुरतेच सीमित राहतात. खरी गरज असते ते मागे पडणाऱ्या, विषय न समजणाऱ्या, जेमतेम पास होणाऱ्या मुलांवर प्रयत्न करण्याची. दुर्देवाने त्यांच्यावर मेहनत घेणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन मिळेल अशी कोणतीही व्यवस्था आपल्याकडे नाही. आज पुन्हा पाचवी व आठवीच्या परीक्षा सुरू होणार आहेत. त्यामुळे मुलांच्या नापासाचे व गळतीचेही प्रमाण वाढेल. ते रोखण्यासाठी सरकार काय करणार याचा खुलासा झालेला नाही. मुलांना धड लिहिता-वाचता किंवा गणिते करता येत नसताना निव्वळ वरच्या वर्गात ढकलणे ही त्यांची, पालकांची व समाजाची फसवणूकच होती. पण आता परीक्षा सुरू झाल्या म्हणजे हा प्रश्न सुटला असे समजणे ही आणखी मोठी फसवणूक ठरेल. सध्या आर्टिफिशियलइंटेलिजन्स किंवा एआय तसेच ऑनलाईन वर्ग इत्यादींचा बराच गवगवा चालू आहे. नापास होणाऱ्या मुलांच्या क्षमता सुधारण्यासाठी या तंत्रज्ञानाचा काही वापर करून घेता येतो का हे तपासायला हवे. शिवाय, आपले अभ्यासक्रम आणि बहुसंख्य जनतेचे प्रत्यक्ष आयुष्य यांचा काही संबंधच नसतो. तो जोडावा लागेल. मुलांना गोडी वाटेल व त्याच वेळी त्यांच्यातल्या प्रयोगशीलतेला आव्हान देईल असे शिक्षण ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

विचार

# जॉर्ज सोरोसशी संबंधांवरून काँग्रेसची गोची

***उद्योजक गौतम अदानी यांनी अमेरिकेतील काम मिळवण्यासाठी लाच दिल्याच्या कथित आरोपावरून काँग्रेसने गेल्या १५ दिवसांपासून संसदेच्या कामकाजात अडथळे आणले आहेत. या शहाला काटशह म्हणून भारतीय जनता पक्षाने जॉर्ज सोरोस आणि सोनिया गांधी यांच्या कथित संबंधाचा मुद्दा उपस्थित केला आहे. जॉर्ज सोरोस जगभर वादग्रस्त आहेत. कोण आहेत जॉर्ज सोरोस, त्यांचा सोनिया गांधी यांच्यांशी काय संबंध?***

**भागा वरखडे**

जॉर्ज सोरोस आणि काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमधील कथित संबंधांच्या मुद्द्यावरून संसदेचे कामकाज अलिकडे पुन्हा एकदा विस्कळीत झाले. या मुद्द्यावर भाजप सातत्याने आक्रमक भूमिका घेत आहे. या मुद्द्यावर चर्चेची मागणी करत त्यांनी संसदेत गोंधळ घातला. एका पत्रकार परिषदेत भाजपने आरोप केला होता की काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी या जॉर्ज सोरोस फाऊंडेशन निधी पुरवत असलेल्या संस्थेशी संबंधित आहेत. त्या फाऊंडेशनने काश्मीरच्या स्वतंत्र राष्ट्राच्या कल्पनेला पाठिंबा दिला होता. भाजपने म्हटले होते, की हे संबंध भारताच्या अंतर्गत बाबींवर विदेशी संस्थांचा प्रभाव दर्शवतात. भाजपचे म्हणणे आहे की 'ऑर्गनाइज्ड क्राइम अँड करप्शन रिपोर्टिंग प्रोजेक्ट' आणि हंगेरियन-अमेरिकन व्यापारी जॉर्ज सोरोस यांनी भारताची अर्थव्यवस्था उद्ध्वस्त करण्यासाठी आणि मोदी सरकारला बदनाम करण्यासाठी विरोधकांशी संगनमत केले आहे. फोरम ऑफ डेमोक्रॅटिक लीडर्स इन एशिया पॅसिफिक (एफडीएल-एपी) फाऊंडेशनच्या सहअध्यक्ष म्हणून सोनिया गांधी जॉर्ज सोरोस फाऊंडेशनद्वारे अर्थसहाय्यित संस्थेशी संबंधित असल्याचा दावा भाजपने केला आहे. पक्षाच्या मते 'एफडीएल-एपी फाऊंडेशन'ने काश्मीर हा वेगळा प्रदेश मानला जावा असे मत व्यक्त केले आहे. सोनिया गांधी आणि काश्मीरला स्वतंत्र राज्य म्हणून मान्यता देण्याच्या कल्पनेला पाठिंबा देणारी संघटना यांच्यातील हे संबंध भारताच्या अंतर्गत घडामोडींवर विदेशी संस्थांचा प्रभाव आणि अशा संबंधांचे राजकीय परिणाम दर्शवतात.

भाजपने दावा केला की राजीव गांधी फाऊंडेशनच्या अध्यक्षपदामुळे सोनिया गांधींची जॉर्ज सोरोस फाउंडेशनशी भागीदारी झाली. ती भारतीय संस्थांवर विदेशी निधीचा प्रभाव दर्शवते. या मुद्द्यावर पक्षाचे सुधांशू त्रिवेदी यांनी पुन्हा पत्रकार परिषद घेऊन हा अत्यंत गंभीर विषय असल्याचे सांगितले. हा प्रश्न राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित आहे. परकीय शक्तींशी असलेल्या काँग्रेस पक्षाच्या या युतीमुळे देशाची सुरक्षा धोक्यात आली आहे. काँग्रेसचे माजी नेते नटवर सिंह यांनीही सोनिया गांधी यांना उद्देशून लिहिले होते की पक्षात विदेशी शक्ती सक्रिय आहेत. काँग्रेस खासदार शशी थरूर यांनी जाहीरपणे जॉर्ज सोरोस यांचा जुने मित्र असा उल्लेख केला होता. या पार्श्वभूमीवर सोरोस हे सध्या भारतीय राजकारणात वादाचा विषय झाले आहेत. अर्थात हे पहिल्यांदाच घडत आहे किंवा सोनिया गांधी आणि सोरोस यांच्यावर पहिल्यांदाच आरोप होत आहेत असे नाही. भारतीय जनता पक्षाने गांधी कुटुंबासह काँग्रेस पक्ष आणि त्यांचे प्रमुख नेते राहुल गांधी यांच्यावर टीका करण्यासाठी सोरोस याचे नाव घेतले.

भाजपने राहुल गांधी देशद्रोही असल्याचा आरोप केला आणि काँग्रेस पक्ष कथितपणे भारताविरुद्ध सोरोस यांचा अजेंडा पुढे रेटत असल्याचा आक्षेप घेतला. भाजपचे हे आरोप जॉर्ज सोरोस यांच्याशी संबंधित वादांच्या जागतिक गाथेतील एक उदाहरण आहे. 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ) च्या माध्यमातून त्याच्या आर्थिक शोषणापासून परोपकारी उपक्रमांपर्यंत सोरोस प्रशंसा आणि टीका या दोन्हींच्या केंद्रस्थानी आहेत. सोरोस याचा जन्म १२ ऑगस्ट १९३० रोजी हंगेरीच्या बुडापेस्ट येथे झाला. नाझी राजवटीत तो ज्यू कुटुंबात वाढला. तो आपली ओळख लपवून होलोकॉस्ट (नाझी जर्मन राजवटीत केलेले ज्यूंचे राज्य-प्रायोजित हत्याकांड) मधून वाचला आणि नंतर इंग्लंडला गेला. त्याने 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' मध्ये शिक्षण घेतले आणि तत्त्वज्ञ कार्ल पॉपर आणि त्यांच्या ओपन सोसायटीच्या विचारांनी खूप प्रभावित झाला. १९७० मध्ये सोरोसने सोरोस फंड मॅनेजमेंट या हेज फंडची स्थापना केली. त्यातून त्याला प्रचंड संपत्ती मिळाली. त्याची सर्वात वादग्रस्त आर्थिक चाल १९९२ मध्ये आली, जेव्हा त्याने ब्रिटिश पौंडविरुद्ध पैज लावली आणि एका दिवसात एक अब्ज पौंडपेक्षा जास्त कमाई केली. यामुळे त्याला 'द मॅन हू ब्रोक द बँक ऑफ इंग्लंड' असे टोपणनाव मिळाले. सोरोसने त्याच्या आर्थिक जाणकारांसाठी जागतिक ख्याती मिळवली असली तरी त्याच्या चाली अर्थव्यवस्था अस्थिर करतात, अशी टीका केली गेली आहे.

'ओपन सोसायटी फाऊंडेशन'च्या माध्यमातून सोरोसने जगभरातील लोकशाही, अभिव्यक्तीस्वातंत्र्य आणि मानवी हक्कांना प्रोत्साहन देणाऱ्या उपक्रमांसाठी ३२ अब्ज डॉलरहून अधिक देणगी दिली आहे. त्याच्या फाऊंडेशनने कम्युनिस्टोत्तर युरोपमधील नागरी समाज प्रकल्पांना तसेच अमेरिका आणि इतरत्र प्रगतीशील चळवळींना निधी दिला आहे. सोरोसने हुकूमशाही शासन, उत्पन्न असमानता आणि हवामानबदल या मुद्द्यांवरही आवाज उठवला आहे. तथापि, विरोधकांचा असा युक्तिवाद आहे, की सोरोस आपली संपत्ती राजकीय कथांना आकार देण्यासाठी आणि परोपकाराच्या नावाखाली सार्वभौमत्व हडपण्यासाठी वापरत आहे. २०२० मध्ये, दावोस येथील 'वर्ल्ड इकॉनॉमिक फोरम'मधील भाषणादरम्यान सोरोसने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि सरकारवर उघडपणे टीका केली. तेव्हापासून तो भाजपच्या रडारवर आहे. सरकार एकाधिकारशाहीला प्रोत्साहन देत असल्याचा आरोप त्याने केला. सोरोसने नागरिकत्व दुरुस्ती कायदा आणि जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यावर टीका केली आणि मोदी सरकारवर फूट पाडणारी धोरणे राबवल्याचा आरोप केला. जागतिक स्तरावर लोकशाहीला धोका निर्माण करणाऱ्या राष्ट्रवादी नेत्यांपैकी एक या शब्दांमध्ये त्याने मोदी यांचा उल्लेख केला. त्याच्या वक्तव्यावर भारतीय नेते आणि टीकाकारांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या. भारताच्या देशांतर्गत व्यवहारात परकीय हस्तक्षेप असल्याची त्याची टिप्पणी भाजपने स्पष्टपणे नाकारली.

सोरोसच्या 'ओपन सोसायटी फाऊंडेशन' (ओएसएफ)वर भारतातील सरकारी धोरणांचा विरोध करणाऱ्या 'एनजीओ' आणि कार्यकर्त्यांना निधी पुरवल्याचा आरोप आहे. त्याच्या संस्थेने 'सीएए' आणि २०२० च्या कृषी कायद्यांविरोधातील निदर्शनांसाठी निधी उपलब्ध करून दिल्याचा आरोप टीकाकार करतात. भारतीय एजन्सींनी 'ओएसएफ'शी संबंध असल्याचा संशय असलेल्या 'एनजीओं'चा तपास करत देशविरोधी कारवायांद्वारे देशाला अस्थिर करण्याचा आरोप केला आहे. काही भारतीय समालोचक आणि उजव्या विचारसरणीच्या गटांनी दावा केला आहे की सोरोसचा निधी अप्रत्यक्षपणे खलिस्तान राज्याचा पुरस्कार करणाऱ्यांसह फुटीरतावादी चळवळींना समर्थन देतो. या दाव्यांचे थेट पुरावे नसले, तरी आरोपांमुळे भारताच्या अंतर्गत बाबींमध्ये हस्तक्षेप करणारा म्हणून सोरोसची प्रतिमा मजबूत झाली आहे. 'ओएसएफ'सारख्या संस्थांच्या कथित विदेशी हस्तक्षेपाला प्रतिसाद म्हणून भारत सरकारने 'फॉरेन कॉन्ट्रिब्युशन रेग्युलेशन ॲक्ट'अंतर्गत नियम कडक केले आहेत. विदेशी निधीचा गैरवापर केल्याप्रकरणी अनेक स्वयंसेवी संस्थांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. भाजप सातत्याने सोरोसचा संबंध काँग्रेस पक्षाशी जोडतो आहे. राहुल गांधी हे भारताला अस्थिर करण्याच्या सोरोसच्या अजेंड्याशी संबंधित असल्याचा आरोप भाजपने केला आहे. भाजपचा असा दावा आहे, की ज्या मुद्द्यांवर काँग्रेस पक्ष भारत सरकारच्या धोरणांवर टीका करतो, ते सोरोस अनुदानित संस्थांद्वारे प्रसारित केलेल्या आंतरराष्ट्रीय कथनाशी जुळतात.

राहुल यांना सर्वोच्च देशद्रोही संबोधत भाजपने देशांतर्गत राजकीय असंतोषाला परकीय हस्तक्षेपाशी जोडण्याचा प्रयत्न केला असून सोरोसला या कथित षडयंत्रातील प्रमुख खेळाडू मानले आहे. सोरोसच्या आर्थिक कारनाम्यांमध्ये १९९२ च्या 'ब्लॅक वेन्सडे क्रायसिस'चाही समावेश आहे. त्यासाठी त्याच्यावर मोठ्या प्रमाणावर टीका झाली होती. पैसा कमावण्यासाठी विकसनशील देशांच्या अर्थव्यवस्था अस्थिर केल्याचा आरोप त्याच्यावर आहे. १९९७ च्या आशियाई आर्थिक संकटादरम्यान सोरोसवर चलन व्यापाराद्वारे आर्थिक अस्थिरता वाढवल्याचा आरोप होता. त्याच्यावर इमिग्रेशन, 'एलजीबीटीक्यू' अधिकार आणि इतर देशांमधील सरकारविरोधी निदर्शकांना निधी देऊन राजकारणात हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप आहे. हंगेरी आणि रशियासारख्या देशांनी त्याच्यावर त्यांच्या देशांतर्गत राजकारणात हस्तक्षेप केल्याचा आरोप केला आहे, तर उजव्या विचारसरणीचे नेते त्याला जागतिक स्तरावर राष्ट्रीय सार्वभौमत्वासाठी धोका मानतात. सोरोस अनेकदा कट सिद्धांतांच्या केंद्रस्थानी असतो. त्याच्यावर स्वत:चा राजकीय अजेंडा पुढे नेण्यासाठी संकटे भडकवल्याचा आरोप केला जातो. सोरोस हे अत्यंत वादग्रस्त व्यक्तिमत्व आहे. त्याचे समर्थक सोरोसला एक धूर्त आणि शक्तिशाली अब्जाधीश मानतात. गौतम अदानीबाबत सरकारला घेरण्याचा प्रयत्न करणारी काँग्रेस सोरोसच्या मुद्द्यावर अलिकडे कोंडीत सापडली. सोरोसच्या निमित्ताने भाजपने काँग्रेसच्या सर्वोच्च नेतृत्वाला गोत्यात उभे केले आहे. या प्रश्नाला कसे सामोरे जायचे, हे काँग्रेसला समजत नाही.

आजकाल

# शेतमालाच्या किंमती आणि आपला विकास

**सोमिनाथ घोळवे**

आज पाव लादी घेण्यास गेलो असता, १५ रुपयांना मिळणारी २० रुपयांना झाली असल्याचे दुकानदारांनी सांगितले. मी थोडासा विचार करू लागलो. कारण गेल्या वर्षी डिसेंबर महिन्यात ६ पावाची लादी १२ रुपयांना होती. ती मे महिन्यात १५ रुपयांना झाली होती. तर कालच्या १६ तारखेपासून ५ रुपयांनी महाग होऊन २० रुपयांना झाली आहे. अगदी संथगतीने पाव लादीची किंमत वाढलेली दिसून येते. पावलादीची किंमत एक वर्षात ८० तक्क्यांनी वाढली आहे हे लक्षात आले नाही. हे केवळ पावलादीच्या बाबतीत आहे असे नाही तर इतरही खाद्य पदार्थाच्या किंमती बाबतीत दिसून येईल. केवळ त्याकडे बारकाईने पाहण्याची गरज आहे.

छोट्या-छोट्या प्रकिया मालाच्या (प्रकिया खाद्यान्नाच्या) किंमती प्रचंड वेगाने वाढतात, हे लक्षात देखील येत नाही. दुसरीकडे मात्र उत्पादित शेतमालाच्या किंमती वाढत नाही. आगदी १० वर्षांपूर्वी जेवढ्या होत्या, त्यात देखील घसरण होताना दिसून येते. खाद्यान्नाच्या किंमती ऐवढ्या वेगाने वाढणे मात्र शेतमालाचे किंमतीमध्ये वाढ न होणे, असे का हे समजून घेणे गरजेचे आहे. या सर्वाचे मूळ अर्थकारण, राज्यव्यवस्थेतील धोरण निर्मिती, शेतमाल उत्पादन व्यवस्था आणि प्रकिया उद्योगाची मोनोपोली, भांडवलदारांची गुंतवणूक याम धे आहे. दुसऱ्या बाजूने खाद्यान्नाच्या किंमती वाढणे म्हणजे तळागाळातील (गरीब वर्गाच्या) वर्गाच्या तोंडातील घास हळूहळू काढून घेणे होय. हळूहळू जगण्याचे प्रश्न गंभीर होऊ लागले आहेत. नेमके राज्य व्यवस्था आणि अर्थव्यवस्थेत काय चालू आहे?. उत्पादक घटकांपेक्षा ( शेतकऱ्यांपेक्षा ) इतरांना जास्त फायदा होताना दिसून येतो. याचा गांभीर्याने विचार होणे आवश्यक आहे. नाहीतर एक दिवस याची मोठी किंमत राज्य - अर्थ व्यवस्थेला मोजावी लागणार आहे.



थोडं उघड्या डोळ्याने विकासाकडे पाहिले तर चालू असलेला खरोखर ''विकास'' आहे का? असा प्रश्न पडतो.

नवीन महामार्ग, उंच गगनचुंबी इमारती आणि विस्तीर्ण निवासी वसाहतींचा यास ''विकास'' समजू लागलो आहोत. विकासाच्या नावाखाली आपण आपल्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा आणि निसर्गाच्या समतोलाचा त्याग करत आहोत? असा प्रश्न पुढे येतो. प्रत्येक वेळी नवीन महामार्ग किंवा गृहनिर्माण प्रकल्प सुरू केला की जंगले साफ केली जातात. अर्थात पर्यावरणीय परिसंस्था नष्ट करत असतो. खरोखरच विकास करत आहोत की पर्यावरणीय आपत्तीचा नाश करत आहोत? हा गांभीर्याने विचार करायला लागणारा प्रश्न आहे.

'विकास' हा शब्द शहरीकरण, रस्ते आणि उद्योगांसाठी जमिनीच्या परिवर्तनाचे वर्णन करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरला जातो. मात्र याची फार मोठी किंमत मोजावी लागतेय हे नजरेआड करता येत नाही. उदाहरणार्थ, समृध्दी महामार्ग घ्या. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली. तसेच सुपीक जमीन वापरली गेली आहे. या द्रुतगती मार्गाने प्रवास करणे सोपे झाले असले तरी, यामुळे जैवविविधता नष्ट झाली, प्राण्यांचे निवासस्थान विस्कळीत झाले आणि वायू आणि ध्वनी प्रदूषणाला हातभार लागला. हा विकास नाही; प्रगतीच्या नावाखाली तो विनाश आहे असे म्हणावे लागेल. पर्यावरणाचा समतोल राखण्यात जंगले महत्त्वाची भूमिका बजावतात. ते कार्बन सिंक म्हणून काम करतात, ऑक्सिजन देतात, प्राणी आणि वनस्पतींच्या असंख्य प्रजाती जतन करून ठेवतात. जेव्हा आपण रस्ते आणि घरे तयार करण्यासाठी जंगलतोड करतो, तेव्हा आपण नैसर्गिक व्यवस्थेला बाधा आणतो. दुसरे उदाहरण, शहरांचा विस्तार होत असताना जमिनीची मागणी वाढते. रस्ते, इमारती आणि पायाभूत सुविधा प्रकल्पांना प्राधान्य दिले जाते, अनेकदा त्यांच्या पर्यावरणीय परिणामाचा विचार केला जात नाही. अलीकडे शहरांच्या भोवती रिंग रोड मार्ग तयार करण्यासाठी शेतजमिनीचा विस्तीर्ण भाग मोकळा करण्यात येत आहे. यामुळे अल्पावधीत आर्थिक वाढ होऊ शकते, परंतु दीर्घकालीन परिणाम गंभीर आहे. मातीचा ऱ्हास, पाण्याची कमतरता आणि कृषी उपजीविकेचे नुकसान हे अनियंत्रित विस्ताराचे काही परिणाम आहेत.

'विकासा'मध्ये काय चूक होत आहे? प्रगतीच्या नावाखाली आपण आपली जंगले, वन्यजीव आणि भावी पिढ्यांचा बळी देत आहोत. जसजसे शहरीकरण जंगलाच्या आगीसारखे पसरत आहे, तसतसे पर्यावरणाला अशा प्रकारे त्रास होतो की त्यातून सावरण्यासाठी अनेक दशके नव्हे तर अनेक दशके लागतील. परंतु खूप उशीर झालेला नाही. अजूनही शाश्वत विकास स्वीकारू शकतो, आपल्या इकोसिस्टमचे संरक्षण करू शकतो. वाढ आणि निसर्ग एकत्रितपणे भरभराट होईल याची खात्री करू शकतो. जर आपण अविचारी विनाशाचा हा मार्ग पुढे चालू ठेवला तर आपण स्वतःला अशा जगात सापडू शकतो जिथे ''विकास'' ने एकेकाळी आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक सौंदर्याच्या सर्व खुणा पुसून टाकल्या आहेत. प्रश्न असा आहे की, खूप उशीर होण्यापूर्वी विकासाचा मार्ग बदलण्यास तयार आहोत का? **(साभार)**

लोकसंसद

## संविधान माझा अभिमान

संविधान देशाच्या संपूर्ण बांधणीचा पायाच आहे. असंख्य भाषा जाती पंथ धर्म भारतासारख्या देशात आहेत. भारतीय संविधानाने सार्वभौमत्व दिले आहे. त्याचबरोबर भारताच्या सर्व नागरिकांना सामाजिक, राजनैतिक न्याय आर्थिक न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, अध्या व उपासना यांचे स्वातंत्र्य बहाल केलेले आहे. सर्व नागरिकांना समान दर्जा, समान संधी प्राप्त करून देणारे, आपले संविधान आहे, हे संविधान भारताच्या दि. २६ नोव्हेंबर १९४८ रोजी स्वतःप्रत अर्पण केले आहे. संविधान सभेने समस्त भारनियमचे प्रतिनिधित्व करीत देशाला सर्वोत्तम सर्वांग सुंदर असे संविधान अर्पण केले आहे. ज्याचा गौरव संविधान दिन म्हणून २६ नोव्हेंबर रोजी साजरा केला जातो. भारताची राज्यघटना उद्देशिका, मुख्य भाग व १२ पुरवण्या (परिशिष्टे) अशा स्वरुपात विभागाला आहे. मुख्य संविधानाचे २५ भाग असून ते असे प्रकारामध्ये विभागले आहेत. राज्याची महत्त्वाची उद्दिष्ट्ये पहायल गेली तर लोकशाहीत जनता ही राज्यकर्ती असते आणि पर्यायाने जनतेवरच व राज्य केले जाते : राज्यघटनेद्वारे काही उद्दिष्ट्ये आहेत ती साध्य केली जातात. ✻ सरकारच्या शक्तीवर बंधन आणली जातात. ✻नागरिकांचे सभेच्या दुरूपयोगापासून रक्षण करणे. ✻ चालू आणि भविष्याम येणाऱ्या पिढ्यांमध्ये होणाऱ्या बदलांचे नियमन भरणे आणि नवे बदल स्वीकारण्याची सहनशक्ती समाजात निर्माण करणे. समाजातील असमानता नष्ट करणे समानता आणणे. संविधानवरील उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी तरतूदी केल्या गेल्या असल्या तरी सर्वसामान्य लोकांच्या नागरिकांच्या अपेक्षा, इच्छा आंकाक्षा पूर्ण झाल्या आहेत का? याबाबत अनेक मतमतांतरे आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक देश लोकशाही विचारसरणीचे झाले. युगोस्लाव्हिया सोव्हियत संघ या सारखे देश दुंभगले भारतामध्ये मात्र भौगालिक एकात्मता आणि राज्यघटनेचे पूर्ण नियंत्रण असल्यामुळे लोकशाही खंबीरपणे टिकून राहिली संविधानामुळे भारताने जगात स्वतःचे विशिष्ट स्थान निर्माण केले आहे. सर्वसामान्य नागरिकांचे जीवन पुर्णपणे सुखकर झालेले नाही हे सत्य आहे परंतु एक जागतिक ओळख भारताची आणि नागरिकांची निर्माण झाली आहे. आपल्या देशात मुख्याचा ऱ्हास, भौगोलिक, भाषिक सामाजिक भिन्न विभिन्नता, राजकारणातील गुन्हेगारी इ. सर्व आहे. परंतू याचा दोष आपल्या संविधानाला देता येणार नाही. या सर्व गोष्टी आपण सर्वजण जबाबदार आहोत. राज्यघटनेकडे बोट दाखवण्यापेक्षा देशाची प्रगती होण्यासाठी एकात्मता, समानता आणण्याची जबाबदारी ही आपल्या सर्व नागरिकांची आहे. संविधानाला बांधणारी, हाताळणारी नागरिक जागृत असणे गरजेचे आहे. भारतीय संविधानाचे भविष्य हे त्यावरच निर्भर आहे, संविधानाबद्दल सर्व नागरिकांना साक्षर होणे गरजेचे आहे. जेव्हा स्वातंत्र्यदिवशी आपला तिरंगा फडकतो त्याचप्रमाणे संविधानाची प्रत प्रत्येक नागरिकांनी आपल्या घरात ठेवणे गरजेचे आहे त्या संविधानाचे वाचन स्वतः केले पाहिजे इतरांसाठी केले पाहिजे संविधान वाचवा! अशा पद्धतीची घोषणा देण्याअगोदर ते वाचले पाहिजे, प्रत्यक्षात संविधान परिपूर्ण आहे ते 'वाचवणे' यापेक्षा वाचणे महत्वाचे आहे आणि प्रत्येक नागरिकांनी संविधान माझा अभिमान, असे स्पष्ट बोलायला हव.

**डॉ. विलास पवार**

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२६ डिसेंबर**

**१९१४** : कवी,विचारवंत, समाज सुधारक, स्वातंत्र्य सेनानी मुरलीधर देविदास आमटे तथा बाबा आमटे यांचा जन्म, गांधी, विनोबांचा सहवास लाभलेल्या बाबांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभागी होऊन कारावास भोगला. आपले सारे आयुष्य त्यांनी कुष्ठरोगाच्या सेवेसाठी अर्पण केले. त्याचबरोबर मराठी साहित्याची सेवा ज्वाला आणि फुले, सार्वजनिक संस्थांचे संकलन, माती जागवी त्याला मत, उज्वल उद्यासाठी अशी पुस्तके लिहिली. **१९३८:-** समीक्षात्मक लेखक दत्तात्रय दिनकर पुंडे यांचा जन्म २६ डिसेंबर १९३८ रोजी झाला. पुणे विद्यापीठातून बी.ए. आणि मुंबई विद्यापीठातून एम.ए. केल्यावर पीएच.डी. डॉक्टरेट पुणे विद्यापीठातून संपादन केली. काही काळ ते शासकीय सेवेतही कार्यरत होते. तथापि, त्यांचा मूळ पिंड अध्यापनाचा आणि लेखनाचा. तेव्हा शासकीय नोकरीला रामराम ठोकून, पुणे कॉलेज व मॉर्डन कॉलेजमधून मराठीचे अध्यापन केले. पुंडे यांचे बरेचसे लिखाण समीक्षात्मक आहे. त्यामध्ये 'कुसुमाग्रज' शिरवाडकर : एक शोध' वाङ्मयीन निरीक्षणे, मंथन एक वैचारिक आलेख, निबंध कसा लिहावा, भारताचा सांस्कृतिक वारसा आणि स्वामी विवेकानंद, सुलभ भाषा विज्ञान, कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचा उगम आणि विकास, वाङ्मयीन अवलोकन आदी समीक्षात्मक पुस्तके त्यांच्या नावावर आहेत.पुंडे यांनी काही पुस्तकाचे सहलेखनही केले आहे. त्यामध्ये 'लोकवाचन, व्यावहारिक मराठी, भाषाविज्ञान परिचय, वाङ्मयेइतिहास सद्यःस्थिती आणि अपेक्षा, पुन्हा वामन मल्हार(सहलेखक गो.म.कुलकर्णी) इत्यादींचा समावेश आहे याशिवाय वाङ्मयेइतिहास संकल्पना, गांधीवाद आणि आधुनिक मराठी साहित्य, उजळणी, लकेर ही त्यांची महत्वपूर्ण संपादने होत. तसेच अक्षरदिवाळी, महाराष्ट्रातील जातीसंस्थाविषयक विचार, वाङ्मयीन वाद, वाङ्मयाचे अध्यापन, साहित्यविचार, आजचे नाटककार, संभाजी नगरातील साहित्य विचार आदी पुस्तकांच्या संपादनातही त्यांचा मोलाचा वाटा आहे. मराठी वाङ्मयेइतिहासाचे लेखन. अध्यापन हा त्यांच्या चिंतनाचा व अध्यापनाचा विषय असून त्या बाबतच्या संकल्पना व विचार लेखन स्वरुपात या तळमळीचा विषय आणि म्हणूनच व प्रथम अस्पृश्य उद्धाराचे कार्य त्यांनी तून भाषेचा जन्म आणि विकासतर संत-मर्श घेतला. चा गाजलेला कथासंग्रह. याशिवाय वनांचे पाझर' यासारख्या कथासंग्रहातून चित्रण केले आहे. याशिवाय परशुराम त्यांचे ग्रंथ मूलगामी विचारपद्धतीचे व हत्यधारा, विचारशलाका, विचारमंथन हे 'तारखोऱ्यातील पिन्या, कृष्णाकाठचा ली' यासारख्या त्यांच्या कथा आजच्या / विषयांवर लिहिले, 'पाश्चात्य पुरुषश्रेष्ठ, या, बारा शास्त्रज्ञ' ही चरित्रात्मक पुस्तके, त्सवानिमित्त केसरी-प्रबोध, तात्यासाहेब कर गौरवग्रंथ, विज्ञानाच्या विविध शाखांचा बोध', 'महाराष्ट्र सांवत्सारिक आणि या ग्रंथांनी मराठी साहित्यात मोलाची भर त्यांचे निधन झाले.

**संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**


## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)
९२२६०५५१५५ (अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

आजचे अन्नदाते



चिरायू मिलिंद म्हात्रे, वाढदिवस अलिबाग


# महाराष्ट्र दारूडा करण्याची योजना



## संजय राऊतांची सरकारवर टीका

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्यासाठी लाडक्या बहिणींच्या भावांना आणि नवऱ्याला हे सरकार दारुडे करणार आहेत. १५०० रुपयांसाठी संपूर्ण महाराष्ट्र दारुडा करण्याची योजना असेल तर हे अत्यंत गंभीर आहे, असे म्हणत शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी महायुती सरकारवर निशाणा साधला आहे. खासदार राऊत यांनी बुधवारी (दि.२५) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांना लाडकी बहीण सारख्या योजनामुळे सरकारी तिजोरी मोकळी झाली असून महसुली तूट वाढली आहे.**

ही तूट भरून काढण्यासाठी अर्थमंत्री अजित पवार यांच्या बैठकीमध्ये दारुच्या दुकानांचे परवाने वाढवण्यावर चर्चा झाली, याबाबतची विचारणा करण्यात आली. तेव्हा राऊतांनी सरकारवर जोरदार निशाणा साधला आहे. यावेळी संजय राऊत म्हणाले की, लाडक्या बहिणींना दीड हजार रुपये देण्यासाठी लाडक्या बहिणींच्या भावांना, नवऱ्यांना हे सरकार दारुडे करणार आहेत.

### भविष्यात योजना बंद पडेल

**दरम्यान, लाडकी बहीण योजनेचे निकष आणखी कठोर करण्याच्या हालचाली सरकारने सुरू केल्या आहेत. भविष्यात सरकार अशी योजना बंदही करू शकते. लाखो, हजारो कोटींचे ओझे घेऊन आणि भ्रष्टाचाराची लुटमार सुरु ठेऊन हे राज्य चालवणे सोपे नाही. निवडणुकीच्या आधी मतांसाठी कोणतेही निकष न लावता पैसे वाटले आणि निवडणुका जिंकल्यावर निकष लावण्यात येत आहेत. त्यात दारू दुकानांचे परवाने वाढवणे हा गंभीर मुद्दा आहे. त्यामुळे लाडक्या बहिणींना १५०० रुपयात आपण घरामध्ये कोणते विष आणतोय याचे चिंतन केले पाहिजे, असे राऊतांकडून सांगण्यात आले.**

१५०० रुपयांसाठी संपूर्ण महाराष्ट्र दारुडा करण्याची योजना असेल तर हे अत्यंत गंभीर आहे. दारुची दुकाने वाढवणार, ड्राय डे कमी करणार, त्यानंतर शॉप आणि मॉलमधून दारू विक्री करण्याचेही प्रोपोजल आलेले आहे. काही राज्यात घरपोच दारुही मिळते. काहीही करून लाडक्या बहिणींना १५०० रुपये देण्यासाठी घराघरात दारू पोहोचवा असे सरकारचे नवीन व्हिजन दिसत आहे, असा टोला राऊत यांनी लगावला आहे.

तसेच, लाडक्या बहिणींना १५०० रुपये द्यायचे आणि त्या बदल्यात बहिणींच्या घरात बेवडे, दारुडे निर्माण करायचे. महाराष्ट्राच्या प्रतिमेला कलंक लावणारा हा प्रकार आहे. महसूल वाढवण्यासाठी अजित पवार यांच्यासारखा नेता हा विचार करत असेल तर हे राज्याचे दुर्दैवच म्हणायला हवे. हा त्यांचा विचार असेल तर त्यांनी त्यांच्या होर्डिंगजवर किंवा कार्यक्रमात शाहू, फुले, आंबेडकर यांचे फोटो लावणे बंद केले पाहिजे, अशी जहरी टीका खा. संजय राऊत यांनी केली आहे.

# रेतीमाफियांवर कारवाईची मागणी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**



भिवंडीतील खाडीपात्रातून मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा होत असून रेती माफियांकडून डेजर आणि सक्शन पंपाने राजरोसपणे अवैध रेती उपसा होत आहे. त्यामुळे अवैध रेती उपसा करणाऱ्या डेजर आणि सक्शन पंपावर महसूल विभागाने कारवाई करावी, अन्यथा स्थानिक भूमिपुत्र यावर कारवाई करतील, असा इशारा भिवंडीचे खा. सुरेश म्हात्रे यांनी महसूल यंत्रणेला दिला आहे. मंगळवारी (दि.२४) म्हात्रे यांनी तहसीलदार अभिजीत खोले यांची भेट घेऊन या संदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यावेळी तालुक्यातील तांडेल मंडल तसेच डुबी मारून रेती काढणारे व्यावसायिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भिवंडीतील खाडीपात्राच्या किनारी असलेल्या गावांमध्ये डुबी मारून रेती काढण्याचा व्यवसाय अनेक वर्षांपासून सुरू होता. मात्र, शासनाच्या महाराष्ट्र सागरी मंडळाकडून नियमांची पायमल्ली करून डुबी मारून रेती उत्खनन करणे बंद केले. तसेच, डेजर आणि सक्शन पंपच्या माध्यमातून रेती उत्खनन करण्यास परवानगी दिल्याने हजारो स्थानिक भूमिपुत्र व्यावसायिकांचे पारंपरिक व्यवसाय बंद झाला आहे. अनेक भूमीपुत्रांवर उपासमारीची वेळ आली असल्याचे मत यावेळी म्हात्रे यांनी व्यक्त केले आहे.

## दानवेंनी केले मोठे भाकित

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मंत्रिमंडळ विस्तारात महायुतीतील तिन्ही पक्षांमधील बड्या नेत्यांना मंत्रीपदापासून दूर ठेवण्यात आले. यामुळे महायुतीच्या तिन्ही पक्षात अंतर्गत धुसफूस सुरू आहे. अजित पवार गटाचे नेते छगन भुजबळ यांनी तर आपली नाराजी जाहीर केली आहे. अशातच विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी मोठे भाकित केले आहे. अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषद घेत राज्य सरकारला घेरले आहे. यावेळी ते म्हणाले की, काहीही होऊ शकते. ज्या पद्धतीने भुजबळ व्यक्त होत आहेत ते पाहता अजित पवार यांच्यासोबत ते राहतील असे वाटत नाही. तसेच, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि छगन भुजबळ यांची भेट होत नाही. मात्र, भुजबळ आणि फडणवीस यांची भेट होते. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया जे बोलल्या आहेत, ते बरोबर आहे, असे अंबादास दानवे म्हणाले.

## रोहित पवारांनी मांडला सातबारा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महायुतीचे सरकार स्थापन होऊन १५ दिवसही झालेले नाहीत. त्यात बीड आणि परभणी सारखी घटना घडली, काँग्रेस कार्यालयावर हल्ला झाला, अशा शब्दांत राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारचा सात बारा मांडला आहे. त्यांनी सोशल मिडीयावरील पोस्टवर परभणीत सोमनाथ सूर्यवंशी यांचा संशयास्पद मृत्यू, बीडमध्ये सरपंचाची निर्घृण हत्या, ठाकरे गटाच्या शहर प्रमुखाचे अपहरण, कल्याणमध्ये मराठी कुटुंबाला बेदम मारहाण, कल्याणमध्येच चिमुरडीशी अश्लील चाळे करणाऱ्यास जाब विचारला म्हणून मराठी कुटुंबाला मारहाण, पुण्यात लोहगाव परिसरात कोयता गँगचा रस्त्यावरुन जाणाऱ्या वाहनांवर कोयत्याने वार करत दहशत, छ. संभाजीनगरमध्ये २ कंत्राटी कर्मचाऱ्यांनी इंटरनेट बँकिंगच्या माध्यमातून विभागीय क्रीडा संकुल प्रशासनाला २१.५९ कोटी रुपयांना गंडा घातला, मुंबईत काँग्रेस पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करून तोडफोड तसेच जमिनीच्या वादातून बार्शी तालुक्यात पुतण्याने चुलती आणि चुलत भावाचा खून करण्यात आला, याबाबत आमदार रोहित पवार यांनी महायुती सरकारचा सातबाराच मांडला आहे.

# पोलिसांच्या भूमिकेवर संशय

**। बीड । प्रतिनिधी ।**



बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे खा. बजरंग बप्पा सोनवणे यांनी पोलिसांच्या भूमिकेवरच संशय व्यक्त केला आहे. हत्येच्या घटनेला १६ दिवस उलटून गेले आहेत. तरीही या हत्याकांडाचा मास्टरमाईंड आणि तीन आरोपी फरार आहेत. त्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे, अशी मागणी सोनवणे यांनी बीडमधील पत्रकार परिषदेत केली आहे. संतोष देशमुख यांनी काय गंभीर गुन्हा केला होता? टॉर्चर करून त्यांची हत्या करण्यात आली. ६ डिसेंबरला पोलिसांनी गंभीर गुन्हा दाखल करून का घेतला नाही? ६ आणि ९ डिसेंबरला पोलिसांना कोणी फोन केला? बनसोड नावाच्या पीआयला कोणाचा फोन आला? १० डिसेंबरला संध्याकाळी गुन्हा दाखल होतो. तेही पोलीस अधीक्षक आल्यावर. पोलीस अधीक्षकही पोलीस ठाण्यात येत नाहीत. दुसरीकडे येऊन टाइप करून ते जातात. म्हणजे किती दहशत आहे. ही कुणाची दहशत होती? हे सुद्धा पीआय, पीएसआयने सांगितले पाहिजे, अशी मागणी सोनवणे यांनी केली आहे.

# राजकीय पोस्टरवर प्रतिबंध घाला

## आदित्य ठाकरेंचे मुख्यमंत्र्यांना आवाहन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

गेल्या दोन वर्षांपासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या राजकीय गोंधळात प्रत्येक शहराच्या कानाकोपऱ्यात लावण्यात येणाऱ्या हजारो पोस्टर्स, बॅनर आणि होर्डिंगमुळे शहरांमध्ये बकालपणा येत आहे. त्यामुळे २०२५ या नव्या वर्षात लोकसेवेचा संकल्प करताना राजकीय पोस्टर, बॅनर आणि होर्डिंगवर प्रतिबंध घालण्याचा सर्वात मोठा आणि महत्त्वाचा निर्णय घ्या, असे आवाहन शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे आ. आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केले आहे.


गेल्या दोन वर्षांत राजकीय गोंधळ सुरू असताना राजकीय होर्डिंगचेही पेव फुटले आहे. जगात कुठेही असे राजकीय पोस्टर लावले जात नाहीत, मात्र आपल्याकडे अनेक ठिकाणी बेकायदेशीररीत्या होर्डिंग लावण्यात येत आहेत. यामुळे शहरे विद्रूप होत आहेत. याचा एक नागरिक म्हणून खेद वाटतो, असे आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्र्यांना दिलेल्या पत्रात म्हटले आहे.



होर्डिंगवर प्रतिबंध घातल्यास आपली शहरे स्वच्छ दिसतीलच, शिवाय आपल्या कार्यकर्त्यांनाही अशा खर्चातून दिलासा मिळेल. याबाबत ठोस निर्णय घेतल्यास आपण आपल्या पाठीशी राहू, असेही आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. आपण सत्तेत मुख्यमंत्री आणि आम्ही विरोधी पक्ष म्हणून असलो तरी या गोष्टींवर आपण एकत्र काम केलेच पाहिजे, असे आवाहनही त्यांनी मुख्यमंत्र्यांना केले. आपण याविषयी बैठक बोलावली किंवा सर्व पक्षांना पत्र लिहिले तर मी, माझा पक्ष आपल्यासोबत खांद्याला खांदा लावून उभा राहील, असेही त्यांनी म्हटले आहे.

# शिवप्रेमींची गिरगाव चौपाटीवर धडक

**। मुंबई । प्रतिनिधी ।**



छत्रपती शिवरायांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात व्हावे ही शिवप्रेमींची अनेक वर्षांपासूनची इच्छा होती. त्यानंतर पंतप्रधान मोदी यांनी जलपूजन करूनही स्मारकाचे कामच सुरू झाले नाही. त्याचा निषेध करून सरकारला जागे करण्यासाठी मराठवाडा आणि महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शिवप्रेमी मंगळवारी (दि.२४) सकाळी १० वाजता मुंबईच्या गिरगाव चौपाटीवर धडकले होते. यावेळी, जलपूजनाला परवानगी न देणाऱ्या पोलिसांना गुंगारा देत अरबी समुद्रात जलपूजन दिन साजरा करत सरकारचा नाकर्तेपणाच उघडा पाडण्यात आला आहे.

गिरगाव चौपाटीवर परवानगी नाकारल्यानंतर आंदोलकांनी गेटवे ऑफ इंडिया येथे जलपूजनाचा निर्णय घेतला होता. मात्र, तेथेही पोलिसांनी मज्जाव करून आंदोलकांना अटक केली आणि आझाद मैदानावर आणून येथे जलपूजन करा असे फर्मान सोडले. जलपूजनाला परवानगी नाकारल्यानंतरही शिवप्रेमींनी गनिमी काव्याने जलपूजन केले. यावेळी प्राध्यापक चंद्रकांत भराट, सुरेश वाकडे पाटील, संतोष तांबे पाटील, रवींद्र नीळ, अशोक वीरकर, भारत जाधव, राजुभाऊ नलावडे, देविदास राजळे पाटील, चंद्रकांत सावंत, रोशन डूलगज, नितीन भराट उपस्थित होते.

## ज्वेलर्स लुटणारी टोळी गजाआड

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

नौपाडा पोलिसांच्या हद्दीतील वामन शंकर मराठे ज्वेलर्स हे दुकान लुटणाऱ्या पाच जणांच्या टोळीला ७२ तासांत गजाआड करण्याची कामगिरी नौपाडा पोलिसांनी केली आहे. यावेळी, आरोपींकडून २८ लाख रुपयांहून अधिक मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. त्यांना २१ डिसेंबर रोजी अटक केली असून त्यांचा पोलीस रिमांड मंजूर झाला आहे. या गुन्ह्यातील आरोपींचा पूर्वे इतिहास पाहता त्यांच्यावर गुजराथ आणि राजस्थानमधील पोलीस ठाण्यांत चोरीचे गुन्हे दाखल आहेत. हे आरोपी २४ ते ३५ या वयोगटातील आहेत.

# आधारवाडी तुरुंगात गृहरक्षकाला मारहाण

**। कल्याण । प्रतिनिधी ।**

कल्याण येथील आधारवाडी तुरुंगात सोमवारी (दि.२३) संध्याकाळी एका न्यायबंदीने एका गृहरक्षकाला शिवीगाळ करत मारहाण केल्याची घटना घडली आहे. पंकज यादव असे मारहाण करणाऱ्या न्यायबंदीचे नाव आहे. विनायक भालेराव असे कारागृहातील गृहरक्षकाचे नाव आहे.

गृहरक्षक भालेराव यांनी तक्रारीत म्हटले आहे, की न्यायबंदी पंकज यादव यांना तुरुंगातील मुलाखत कक्षातून घेऊन रुग्णालय कक्षात परत येत होते. दरम्यान, पंकज यांनी गृहरक्षक भालेराव यांना, तू माझी मुलाखत पूर्ण होऊ दिली नाही, असे बोलून पंकज यांनी भालेराव यांना हातवारे करून शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी भालेराव यांनी तुमची मुलाखत अर्धवट राहिलेली नाही. माझ्याशी नीट बोला. यांनंतर पंकज यादव यांनी रागाच्या भरात भालेराव यांच्या सदऱ्याची गळपट्टी पकडली आणि शिवीगाळ करत ठोशाबुक्क्याने मारहाण केली.

# राष्ट्रपती राजवटसारखी परिस्थिती

## संजय राऊतांनी व्यक्त केला संताप

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

सरपंच संतोष देशमुख यांची गावगुंडांकडून निर्घृणपणे हत्या करण्यात आली आहे. या घटनेचे पडसाद संपूर्ण राज्यभरात उमटल्याचे पाहायला मिळत आहेत. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनातही याचे पडसाद उमटले. ज्यानंतर राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणी एसआयटी चौकशी आणि न्यायालयीन चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. परंतु, बीडमधील कायदा सुव्यवस्थेच्या मुद्द्यावरून विरोधकांनी सरकारला घेरले आहे. अशातच आता शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे खा. संजय राऊत यांनी या प्रकरणावरून सरकारवर तर निशाणा साधलाच आहे. परंतु, बीडमध्ये राष्ट्रपती राजवट लावण्यासारखी परिस्थिती असल्याचा टोला देखील त्यांनी लगावला आहे.



याबाबत राऊत म्हणाले की, बीडची परिस्थिती अशी आहे की, एका जिल्ह्यात राष्ट्रपती शासन लागू करावे. आपल्या घटनेत तशी तरतूद नाही. मी परिस्थिती सांगतो. तिथे सामाजिक राजकीय परिस्थिती गंभीर आहे. तिथे दंगल होईल, लोक रस्त्यावर येतील, अशी परिस्थिती आहे. मुख्यमंत्र्यांनी बीडला गेले पाहिजे. ते गृहमंत्री आहेत. त्यांच्या लाडक्या धनुभाऊला (मंत्री धनंजय मुंडे) घेऊन जावे. संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचा आक्रोश जर या सरकारला दिसत नसेल तर हे सरकार माणुसकी शुन्य आहे. त्याबद्दल आमच्या मनात कोणतीही शंका नाही, असा राग राऊतांनी व्यक्त केला.

# सरकारच्या कारभाराविरोधात मोर्चाचे आयोजन

## जितेंद्र आव्हाड यांची माहिती

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली. मात्र, या प्रकरणात अद्याप मुख्य सूत्रधाराला अटक करण्यात आलेली नाही. मंत्री धनंजय मुंडे यांचे जवळचे मानले जाणारे वाल्मीक कराड याचे सूत्रधार असल्याचा आरोप केला जात आहे. यावरून विरोधकांनी सत्ताधाऱ्यांवर आसूडही ओढले. मात्र, अद्याप वाल्मीक कराडची चौकशी झालेली नाही. हे प्रकरण आता चांगलेच तापले असून



सरकारच्या कारभाराविरोधात २८ डिसेंबर रोजी भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे राष्ट्रवादी (शरदचंद्र पवार) पक्षाचे आ. जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या सोशल अकाऊंटवरून याबाबत माहिती दिली आहे. अव्हाड यांनी पोस्टमध्ये लिहिले आहे की, चलो बीड! संतोष देशमुख याची निर्घृण हत्या, बीडमध्ये वाढत चाललेली खुनांची मालिका आणि त्यावर अंकुश ठेवण्यात अपयशी ठरलेले सरकार या निषेधार्थ २८ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता भव्य मोर्चा काढण्यात येणार आहे. महाराष्ट्रातील तमाम नागरिकांनी पक्षाभिनिवेश बाजूला ठेवून सहभागी व्हावे. मी जाणार आहे, तुम्ही पण या. कदाचित, मोर्चाला घाबरून सरकार वाल्मीक कराड आणि त्याच्या साथीदारांना अटक करेल. परंतु, अजूनही वाल्मीक कराडला खुनाचा आरोपी केलेला नाही. हे सरकार किती निर्ढावलेले आहे ते बघा. उभ्या महाराष्ट्राला माहित आहे की, संतोष देशमुखची हत्या कोणी केली, हत्येचा सूत्रधार कोण आहे. मागील दोन वर्षात झालेल्या हत्यांच्या मागे कोण आहे? असे असूनही सरकार शांत झोपले आहे. सरकारला खडबडून जाग आणण्यासाठी चलो बीड, असे आवाहन आव्हाड यांनी केले आहे.

## शिवसेना उद्धव ठाकरे गटाची सरकारवर टीका

# दोन्ही खून सरकार पुरस्कृत

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**मंत्रिमंडळाचे खातेवाटप झाले आणि आता मंत्र्यांचे बंगले वाटपही पार पडले आहे. परंतु, परभणीत सोमनाथ सूर्यवंशी आणि बीडमध्ये सरपंच संतोष देशमुख यांचे नक्की काय झाले? या प्रश्नाचे उत्तर फडणवीस सरकार देऊ शकलेले नाही. सूर्यवंशी आणि देशमुख यांचे खून झाले तसेच हे दोन्ही खून सरकार पुरस्कृत आहेत. त्यामुळे फडणवीस यांनी ‘एसआयटी’ चौकशीचा जो खेळ मांडला आहे, ती धूळफेक आहे, अशा घणाघाती टीका ठाकरे गटाने केली आहे.**



संतोष देशमुख या सरपंचाची बीडच्या रस्त्यावर निर्घृणपणे हत्या झाली. या खून प्रकरणातले खरे आरोपी तसेच सूत्रधार हे सरकारमध्ये सन्मानाने विराजमान आहेत. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अवतीभवती, मंत्रिमंडळात ते वावरत आहेत, असा थेट आरोप ठाकरे गटाने केला आहे. परभणी तसेच बीडच्या हत्या या जातीय द्वेषातूनच झाल्या आणि त्यास महाराष्ट्रातील भाजपा सरकार जबाबदार आहे. सूर्यवंशी हे आंबेडकरी चळवळीचे कार्यकर्ते होते आणि स्वतः संतोष देशमुख हे भाजपाचे कार्यकर्ते असतानाही त्यांचा खून झाला. नमिता मुंदडा यांच्या निवडणुकीत सरपंच देशमुख हे त्यांच्या गावातील भाजपाच्या बुथवर उपस्थित होते. अशा कार्यकर्त्याची हत्या का व्हावी आणि या हत्येमागे सतत एकच नाव का घेतले जाते? असा प्रश्न शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने उपस्थित केला आहे.

तसेच, संतोष देशमुख हत्या प्रकरणात अजित पवार यांचे उजवे हात असलेले मंत्री धनंजय मुंडे यांच्या ‘खास’ वाल्मीक कराडचे नाव घेतले जाते. हे सत्य असेल तर कराड यांना वाचविण्यासाठी धनंजय मुंडे हे नक्कीच प्रयत्न करीत आहेत. कराड यांचा निकाल लागेपर्यंत धनंजय मुंडे यांना मंत्रिमंडळाबाहेर ठेवले असते तर फडणवीस यांची नैतिकता आणि निष्पक्षता उजळून निघाली असती, परंतु मुख्यमंत्री फडणवीस यांनी तसे केले नाही. वाल्मीक कराड यांचा प्रभाव इतका की, देशमुख खून प्रकरणात त्यांना अद्याप पोलिसांनी साधे चौकशीलाही बोलावलेले नाही, याकडे ठाकरे गटाने लक्ष वेधले आहे.

## शिंदे गटाचा फडणवीसांवर निशाणा

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गृहखाते स्वतःकडेच ठेवले आहे. त्यामुळे महायुतीत नाराजी व्यक्त होत होती. गृह खाते आपल्याला मिळावे अशी शिंदे गटाची मागणी होती. आता शिंदेगटाचे खा. बारणे यांनी पिंपरी चिंचवडमध्ये पोलीस हप्तेखारी करत असल्याने सरकार बदनाम होत असल्याची टीका करत थेट मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरच निशाणा साधला आहे. याची राजकीय वर्तुळात चर्चा होत आहे.

सर्व सामान्य नागरिक पोलीस ठाण्यात तक्रार घेऊन गेल्यानंतर त्याची दखल घेतली जात नाही, त्याला अपमानस्पद वागणूक दिली जाते, त्याला खूप वेळ त्या पोलीस ठाण्यात बसून ठेवले जाते आणि तक्रार घेण्यासाठी दिरंगाई केली जाते, असे अनेक प्रकार घडत आहेत. नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत नाही या अनुषंगाने आपण पत्र दिलेले आहे.

एकंदरच पोलिसांचा कारभार जर पाहिला तर कुणाचीतरी पाठीराखण करण्याच्या त्यांचा हेतू दिसतो, हे नाकारून चालणार नाही. काही प्रमाणामध्ये ज्या जमिनीच्या केसेस असतात किंवा त्या ठिकाणी काही प्रकारे अतिक्रमण केले जाते किंवा बांधकाम व्यवसायिकांच्या केस, अशा मलईदार प्रश्नांकडे पोलीस जास्त लक्ष घालत असतात. मात्र, सर्वसामान्य माणसाच्या तक्रारीमध्ये लक्ष घालत नाही, अशी टीकाही त्यांनी राज्याच्या गृहखात्यावर केली आहे.

**निवडक**

## माथेरानच्या दरीत सापडला

**माथेरान :** माथेरानच्या खोलोदरीत कुजलेल्या अवस्थेत मानवी मृतदेह सापडून आला. येथील स्थानिक ग्रामस्थांना मोठ्या प्रमाणात दुर्गंधी येत असल्याने माथेरान पोलिसांना माहिती देण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी घटनेस्थळी धाव घेत पाहणी केली असता कुजलेल्या अवस्थेत मृतदेह आढळला. सहा ते सात दिवसांपूर्वी या व्यक्तीचा मृत्यू झाल्याचा संशय यावेळी पोलिसांनी व्यक्त केला. दरम्यान, हा मृतदेह पदु चांगो उघडा यांचा असल्याचे पोलीस तपासात पुढे आले आहे.

## पैशाचे पाकीट केले परत

**पनवेल :** सापडलेले मौल्यवान पाकीट त्याच्या मूळ मालकास परत करुन पनवेलमध्ये तरुणाने प्रामाणिकपणाचे दर्शन घडविले. अनुराग वाघचौरे असे त्याचे नाव असून, मौल्यवान कागदपत्रांसह पाकीट परत मिळाल्याने संबंधितांनी त्याचे आभार मानले. आधारकार्डवरुन ते पाकीट मानगाव येथील मुस्तफा जावेद फोपलुनकर यांचे असल्याचे लक्षात आले. त्यावरील फोन नंबरवर संपर्क साधून त्याने तुमचे पाकीट माझ्या दुकानात राहिले आहे असे सांगितले. मुस्तफा पनवेल येथे आले असता ते पाकीट त्यांना परत केले.

## मोफत नेत्रतपासणी शिबीर

**रसायनी :** मोतिबिंदू मुक्त मोहपाडा रसायनी अभियानांतर्गत आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल आणि रोटरी क्लब पाताळगंगा यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी आणि मोतिबिंदू ऑपरेशन शिबिराचे शनिवार, दि. २८ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते १ वाजेपर्यंत मोहोपाडा श्री गणेश मंदिर येथे आयोजन करण्यात आले आहे. मोतिबिंदूच्या ऑपारेशनसाठी येताना सोबत रेशन कार्ड आणि आधार कार्डची झेरॉक्स प्रत घेऊन येणे तसेच बीपी शुगरचे गोळ्या चालू असतील तर घेऊन यावे, असे आवाहन डॉ. प्रकाश पाटील यांनी केले आहे.

## कराओके गायन स्पर्धा

**पनवेल :** लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगम तर्फे रविवार दिनांक ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ठीक १० वाजता आंतरशालेय कराओके गायन स्पर्धा बांठीया विद्यालय, नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आल्या आहेत. सदर स्पर्धा इ. ५वी ते ७वी आणि इ. ८वी ते १०वी अशा दोन गटात होणार आहेत. स्पर्धेसाठी प्रवेश फी रु.२००/- असून, प्रत्येक स्पर्धकाला मराठी किंवा हिंदी गाण्यांचा १ मुखडा आणि अंतरा सादर करायचा आहे. विजेत्यांना रोख बक्षीस आणि ट्रॉफी, व सहभाग प्रमाणपत्र देण्यात येईल.

## दोन बांगलादेशी ताब्यात

**पनवेल :** पनवेल तालुका पोलिसांनी धडक कारवाई करत कोन गावाच्या हद्दीत कामानिमित्त फिरणार्या दोन बांगलादेशींना त्यांच्यासह मुलांसह ताब्यात घेतले आहे. कोणत्या वैध प्रवासी कागदपत्राविना भारत-बांगलादेशी सीमेवरील मुलकी अधिकार्‍यांच्या लेखी परवानगीशिवाय अवैध मार्गाने भारतात प्रवेश करून तालुक्यातील कोन गाव परिसरात कामानिमित्त फिरत असलेल्या राजू अफताब शेख (३८), सुमन राजू शेख व त्यांच्यासह त्यांची दोन मुलांना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

# माथेरानवरील पाणीसंकट टळलं

- नवीन पंप आल्याने सुरळीत पाणीपुरवठा
- पर्यटन हंगामावर परिणाम नाही

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

माथेरान शहराला होणारा पाणीपुरवठा नेरळ येथील उल्हास नदीतून होत होता; परंतु वॉटर पॉईप येथील पंप खराब झाल्याने माथेरानला होणार्‍या पाणीपुरवठ्यावर त्याचा विपरीत परिणाम होत होता. पर्यायाने माथेरानमधील शारलोट तलावातून पाण्याच्या उपसा होत असल्याने या तलावाची पाणी पातळी कमी होत होती. त्याचा थेट परिणाम माथेरानमधील पर्यटन हंगामात होणार होता.



● (छायाचित्र : संजय गायकवाड)

माथेरानमधील माजी नगरसेवक प्रसाद सावंत यांनी वेळोवेळी जीवन प्राधिकरणाचे अधिकारी यांच्याशी संपर्क साधून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अशी विनंती केली. तर, स्थानिक आमदारांनीदेखील यात लक्ष घालून अधिकर्‍यांना सूचना केल्या होत्या. याची महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून गंभीर दखल घेत उपअभियंता गरूड, मॅकेनिकल अभियंता राठोड तसेच कार्यकारी अभियंता वेंगुर्लेकर, माथेरान पाणीपुरवठाची देखभाल करणारे राहुल दासरे यांनी परिश्रम करून माथेरान पाणीपुरवठा सुरळीत करण्यासाठी नवीन पंपाकरिता आग्रह धरला होता.

अखेर तो नवीन पंप आला असून, तो लवकरच बसवण्यात येणार आहे, अशी माहिती जीवन प्राधिकरणाकडून देण्यात आली, त्यामुळे माथेरानचा पाणीपुरवठा सुरळीत होणार आहे.

# एमएमआरडीएला जमिनी देणार नाही

## उरणमधील शेतकर्‍यांचा निर्धार

**। उरण । वार्ताहर ।**

उरणमध्ये एमएमआरडीए भूसंपादनास विरोध करण्यासाठी उरण पूर्व भागातील शेतकर्‍यांची बैठक पानदिवे येथे संपन्न झाली. उरण तालुक्यातील २९ महसुली गावे, पनवेल तुक्यातील ७ महसुली गावे व पेण तालुक्यातील ८८ गावांचा समावेश आहे. याअगोदर उरण, पनवेल, पेणमध्ये आलेले सेझचे संकट दूर करून इथल्या शेतकर्‍यांनी इतिहास घडवलेला आहे, यावेळी समन्वयक रुपेश पाटील यांनी प्रास्ताविकात एमएमआरडीला विरोध करण्याचे व जमिनी देणार नसल्याचे सुतवाच केले. यावेळी शेतकर्‍यांनी आपली मते मांडून ठाम विरोध दर्शवला आहे.




येथील आगरी, कोळी, कराडी, बहुजन समाजाच्या जमिनी लाटण्याचे काम शासनामार्फत सुरू असून, या जमिनीवर धनदांडग्यांचा डोळा असल्याचे दिसते आहे. विकासक या नात्याने या जमिनी कवडीमोल भावाने घेऊन येथील समाजाला उद्ध्वस्त करण्याचे काम करण्यात येणार आहे. या संदर्भातली शासन निर्णय निवडणूक आधी प्रसिद्ध झाला होता. एमएमआरडीला विरोध करण्यासाठी पाणदिवे येथील बैठकीत एमएमआरडीला जमीन देणार नसल्याचे शेतकर्‍यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रकाश पाटील यांनी केले.

या बैठकीसाठी उरण सामाजिक संस्थेचे अध्यक्ष सुधाकर पाटील, ॲड. मेघनाथ पाटील, ॲड. डी. के. पाटील, हिरामण पाटील, महेंद्र ठाकूर, डॉ. सुभाष घरत, ॲड. शेखर पाटील, मनोज पाटील, संतोष ठाकूर, ए.डी. पाटील, ॲड. सत्यवान भगत, चंद्रशेखर पाटील, ॲड. नवाले, सुनील वर्तक आदी मान्यवर उपस्थित होते. या बैठकीमध्ये संघर्ष कमिटीवर काम करण्यासाठी संचालकांची नियुक्ती करण्यात आली.

## किशोर पाटील यांचे निधन

**। भाकरवड । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील आंबेपूर-पेझारी येथील किशोर गोरखनाथ पाटील यांचे गुरुवार, दि. १९ डिसेंबर अल्पशा आजाराने निधन झाले. निधनसमयी ते ६८ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाची बातमी कळताच संपूर्ण परिसरावर शोककळा पसरली.



कोएसो. ना.ना पाटील हायस्कूल पेझारी येथून ते सेवानिवृत्त झाले होते. इंग्रजीवर प्रभुत्त्व असणारे एक बहुआयामी व्यक्तिमत्व, माध्यमिक शिक्षक म्हणून कार्यरत असताना अनेक विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य त्यांनी केले. केवळ शिक्षण देणे इतकेच मर्यादित न राहता विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्याचे कार्यदेखील त्यांनी केले. खचलेल्या विद्यार्थ्यांचे त्यांनी मनोबल वाढविले, तर इंग्रजीची भीती असलेल्या बहुसंख्य मुलांच्या मनातून ती भीती नाहीशी करून इंग्रजीची आवड निर्माण केली. हसत खेळत जीवन जगणारे आणि जगायला लावणारे एक सौज्वळ, मितभाषी व्यक्तिमत्व आणि म्हणूनच सर्व विद्यार्थ्यांचे लाडके शिक्षक म्हणून त्यांची एक आगळीवेगळी ओळख होती. त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. कोएसो. ना.ना.पाटील हायस्कूल पेझारी येथे ३० वर्षांहून अधिक कालावधीसाठी इंग्रजी विषयाचे शिक्षक म्हणून सेवा केली. स्व. किशोर गोरखनाथ पाटील यांचे जन्मगाव धाकटे शहापूर हे आहे; परंतु नोकरीच्या निमित्ताने ते पेझारी आंबेपूर-दारभाई तलाव येथे वास्तव्यास होते. सेवानिवृत्त झाल्यानंतरही त्यांनी त्यांच्या राहत्या घरात विनामोबदला मुलांना विद्यादान करण्याचे कार्य केले. तसेच अनेक सामाजिक संस्थांचे पदाधिकारी म्हणून पद भूषविले आणि सामाजिक कार्यातही आपली पकड मजबूत केली. सेवाश्रम सामाजिक विकास सेवा संस्था वाघ्रण रायगडचे संस्थापक सदस्य, शहापूर शेतकरी संघर्ष सेवा संस्थेचे सचिव, आनंददायी शिक्षक मित्र मंडळ पेझारी हायस्कूलचे सभासद, रायगड मित्र दिवाळी अंकाचे संस्थापक जिल्हा प्रतिनिधी, तेजस्विनी फाऊंडेशनचे विश्वस्त पदाधिकारी, मनस्वी मानव सेवा संस्था भाकरवड अलिबागचे विश्वस्त पदाधिकारी अशा विविध संस्था तसेच मंडळाशी संलग्न सक्रिय कार्यकर्ते होते.

अनेक प्रसंगी त्यांनी सढळ हस्ते कित्येक गरजूंना मदत केली असून, कोरोना कालावधीतील कार्यदेखील स्तुत्य आहे. त्यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी ललिता पाटील, दोन विवाहित मुली (एक डॉक्टर, दुसरी सी.ए), जावई, तर मुलगा (लंडन येथे एम.एस.चे शिक्षण घेत आहे.) असा मोठा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी रविवार, दि. २९ डिसेंबर रोजी तर तेरावा १ जानेवारी २०२५ रोजी पेझारी आंबेपूर दारभाई तलाव येथील निवासस्थानी होणार आहे.

## नाईक-अंतुले महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा

**। म्हसळा । वार्ताहर ।**

कोकण उन्नती मित्र मंडळाचे वसंतराव नाईक कला, वाणिज्य आणि बॅ.ए. आर. अंतुले विज्ञान महाविद्यालय म्हसळा येथे दि. २४ डिसेंबर रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

दरवर्षी दि.२४ डिसेंबर हा राष्ट्रीय ग्राहक दिन म्हणून साजरा केला जातो. वसंतराव नाईक महाविद्यालयात सांस्कृतिक विभाग व तहसील कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्ताने तहसील कर्मचारी भालेकर यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, ग्राहकांच्या संरक्षणासाठी करण्यात आलेल्या कायद्यात पुरोगामी आणि व्यापक असा कायदा आहे. असे सांगताना एखाद्या मालाची विक्री चढत्या भावाने होत असेल किंवा मालावर दर्शविलेल्या किमतीपेक्षा जास्त भावाने विक्री होत असेल तर जिल्हा पातळीवर ग्राहक तंटा निवारण यांच्याकडे तक्रार करणे आवश्यक आहे तसेच एखादे वस्तूची खरेदी करताना कर पावती घेणे आवश्यक आहे. आपण खरेदी करीत असलेल्या मालाची क्वालिटि काय आहे, फसव्या व भुलविणार्‍या जाहिराती, ऑनलाइन खरेदी मधील वस्तूंमध्ये होत असलेली फसवणूक याबाबत ग्राहकांनी दक्ष राहिले पाहिजे असे तहसील कर्मचारी भालेकर, ग्रंथपाल प्रा. माशाळे, प्रा.डॉ. बेंद्रे यांनी सांगून उपस्थित सर्वांना राष्ट्रीय ग्राहक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.





या कार्यक्रमास तहसील कर्मचारी भालेकर यांसह महाविद्यालयातील प्रभारी प्राचार्य दिगंबर टेकळे, प्रा. समेळ, ग्रंथपाल प्रा. माशाळे, प्रा.भोसले, प्रा. डॉ. बेंद्रे सलमा नझिरी अतीका नझिरी, प्रा. सिद्दीकी, प्रा.नझिरी, प्रा हालोर, प्रा. दफेदार, प्रा. तांबे, प्रा. मुकादम यांसह विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. माशाळे यांनी केले. प्रास्ताविक प्रा. बेंद्रे यांनी केले, तर आभार तहसीलचे पुरवठा अधिकारी भालेकर यांनी केले.

## गणित दिवस, विज्ञान प्रदर्शन उत्साहात संपन्न

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा शहरातील नगर परिषद शाळा क्र. ३ व ५ येथे गणित दिनानिमित्त गणित दिवस व विज्ञान प्रदर्शन मोठ्या उत्साहात पार पडले.



या कार्यक्रमासाठी नगरपरिषद सी.ई.ओ श्री. एडके, प्रशासकीय अधिकारी शिक्षक विभाग संतोष कुंठे, पंचायत समित शिक्षण विभागाच्या सहाय्यक प्रकल्प समन्वयक श्रीमती गुजर, नगरपरिषदचे केंद्रप्रमुख श्री. लाडे, नगरपरिषदच्या लिपिक पूजा खुले, तसेच नगर परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद, दीपक फाऊंडेशनचे सहाय्यक प्रकल्प समन्वयक आणि स्टेम प्रकल्पाचे कर्मचारी उपस्थित होते. तर, प्रदर्शनामध्ये ३२ सहभाग नोंदवून एकूण मुलांनी ३० वैज्ञानिक व गणितीय प्रतिकृततींचे सादरीकरण केले. दरम्यान, यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक करून शुभेच्छा देण्यात आल्या.

दरम्यान, दीपक फाऊंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होताना दिसत आहे.

## रक्तगट तपासणी शिबीर

**। खांब । वार्ताहर ।**

रोहा तालुक्यातील एम.बी. पाटील इंग्लिश मीडिअम स्कूल येथील विद्यार्थ्यांची मोफत रक्तगट तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.

उपजिल्हा रूग्णालय रोहा व मच्छिंद्र पाटील यांच्या संयुक्त विद्यमाने सदरील रक्तगट तपासणी करण्यात आली. या शिबिरात इ. आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेत असलेल्या एकूण १५० विद्यार्थ्यांची ही तपासणी करण्यात आली. डॉ. गोसावी, डॉ. प्राची पाटील, डॉ. सौ. गोसावी या तज्ज्ञांच्या माध्यमातून व येथील मुख्याध्यापिका पूनम देसाई यांच्या उपस्थितीत रक्तगट तपासणी कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न करण्यात आला. या शिबिरात रक्तगट तपासणी करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांना रक्तगट कार्डचे वाटप उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

## नेरळ स्थानकातील मेन लाईनवर टाकला गर्डर

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

मध्य रेल्वे वरील कर्जत दिशेकडून नेरळ जंक्शन रेल्वे स्थानकात प्रवाशांच्या सोयीसाठी स्काय वॉक उभारला जात आहे. या स्काय वॉकसाठी मेन लाईनवरील गर्डर मुंबई रेल कॉर्पोरेशनच्या अभियंत्यांनी टाकला आहे. त्या भागातील गर्डर टाकण्याचे यशस्वी काम पूर्ण झाल्यामुळे नेरळ स्थानकातील स्काय वॉकच्या कामाला गती मिळाली आहे.

नेरळ जंक्शन स्थानकात मुंबई दिशेकडून कर्जत दिशेकडे असा स्काय वॉक फलाट एकवर बनविला जात आहे. साधारण दहा मीटर रुंदीचा हा स्काय वॉक असून, फलाट एकवरून हा स्काय वॉक मुंबई-पुणे मेन लाईनवरून फलाट एक आणि पुढे रेल्वे पार्किंग असा जात आहे. त्यामुळे स्काय वॉकचे बांधकाम करताना मुंबई-पुणे मेन लाईनवर कधी या स्काय वॉकचे गर्डर टाकले जाणार याकडे लक्ष लागून राहिले होते.

## जीवन पाटील यांना द्रोणागिरी भूषण पुरस्कार



**। अलिबाग । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील ग्रामपंचायत पोयनाड हद्दीतील भाकरवड गावचे रहिवासी जीवन दत्तात्रेय पाटील यांना जिल्हास्तरीय द्रोणागिरी भूषण पुरस्कार शुक्रवार, दि. २० डिसेंबर रोजी प्रदान करण्यात आला. उरण येथील द्रोणागिरी युवा महोत्सवानिमित्त कार्यक्रमात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

जीवन दत्तात्रेय पाटील हे सन २००८ पासून मनस्वी मानव सेवेच्या माध्यमातून वारस-बेवारस मृतदेहांची विनामूल्य सेवा करत आहेत. त्यांनी आजपर्यंत १०३ मृतदेहांची पोलिसांच्या सहकार्याने विल्हेवाट लावली आहे. कोणताही अपघात झाला की जीवन पाटील त्यांच्याकडील असलेली रुग्णवाहिका घेऊन तात्काळ अपघातस्थळी जाऊन मदतकार्य करतात. आजपर्यंत १५० हून अधिक अपघातग्रस्तांचे प्राणही त्यांनी वाचविले आहेत. जीवन पाटील यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेत रायगडभूषण, जीवन गौरव, समाज भूषण, समाजरत्न, ग्रीन फाऊंडेशन ग्रीन वर्ल्ड, पोयनाड भूषण, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सन्मान अशा एकूण ५८ पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. द्रोणागिरी भूषण पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## विद्यार्थ्यांना व्यक्त होण्यासाठी तंत्र प्रदर्शन महत्त्वाचे : चौधरी

**। नागोठणे । वार्ताहर ।**

आयटीआच्या विविध व्यवसायातील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना थिअरी आणि प्रात्यक्षिक शिकविण्यात येत असते. विद्यार्थ्यांना जे शिकायला मिळते, त्याचे कुठेतरी व कोणाकडे तरी प्रदर्शन व्हावे, विद्यार्थ्यांच्या डोक्यातील विचार मनसोक्तपणे बाहेर पडावे यासाठी हे तंत्र प्रदर्शन महत्त्वाचे असल्याचे मत जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी नितीन चौधरी यांनी आद्य क्रांतिकारी वासुदेव बळवंत फडके औद्योगिक प्रशिक्षण संस्था नागोठणे मध्ये मंगळवारी (दि.२४) संपन्न झालेल्या तंत्र प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी व्यक्त केले.



यावेळी नागोठणे आयटीआयच्या औद्योगिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व खोपोली येथील थरमॅक्स कंपनीचे एचआर प्रमुख सुनील कदम, धाटाव येथील सुदर्शन केमिकल कंपनीचे एच.आर विभागाचे प्रमुख शांताराम सोनवणे इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख सुरेश हुंबरवाडी, रैना इंजिनिअरिंग कंपनीचे रामावतार मोदी, नागोठणे प्राचार्य विद्या पाटील, पनवेल आयटीआयचे उपप्राचार्य विजयकुमार टिकोले, गटनिदेशक संदीप वेले, म्हसळा आयटीआयचे प्र. प्राचार्य एस.आर. जोशी, तळा आयटीआयचे प्रभारी प्रा. एस.एन. शेरे, पनवेल आयटीआयचे दीपक बाक्कर, नागोठणे आयटीआयचे गटनिदेशक सिद्धार्थ भगत आदींसह तंत्र प्रदर्शनात सहभागी झालेल्या जिल्ह्यातील १४ आयटीआयचे निदेशक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जिल्हास्तरीय तंत्र प्रदर्शनात जिल्ह्यातील १४ आयटीआयमधील ४८ प्रकल्प ठेवण्यात आले होते. यामध्ये नागोठणे आयटीआयच्या थर्ड आय ब्लाइंड या प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला. तर खालापूर आयटीआयच्या कुशन अँड ज्वेलरी एम्ब्रॉयडरी या प्रकल्पाला द्वितीय क्रमांक व उरण आयटीआयच्या चिलर एसी प्लांट प्रकल्पाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **नागावमधील हॉटेलमध्ये** काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. वेटर, ब्रेकफास्ट हेल्पर, हाऊस कीपर १ ते ३ वर्षे अनुभव असणार्‍यांनी सकाळी १० ते ५ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअ‍ॅप वर मेसेज करावा. मोबाईल - ७५५९१८४६१२
- **अलिबाग आणि परिसरातील** Bsc, Bcom, BA पदवीधर उमेदवारांना Work From Home पद्धतीने कामकाज करण्याची सुवर्णसंधी. त्वरित संपर्क करा. ९४०३२१२१२१
- **अलिबाग येथे मोक्याच्या ठिकाणी** EDII नॅशनल इन्स्टिट्यूट कार्यालयाकरीता जागा भाड्याने पाहिजे. संपर्क : शशिकांत दनोरीकर ७७७५८०२४९७
- **रिसोर्टमध्ये काम करण्यास** मुलगा हवा आहे. संपर्क- ९६०७१०२३५७, ठिकाण सासवणे.
- **रिसोर्टमध्ये काम करण्यास जोडपं** हव आहे. संपर्क- ९६०७१०२३५७ ठिकाण सासवणे.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

## पर्यटनवाढीसाठी शासनाकडून निधीची आवश्यकता

# चौल-रेवदंडा विकासापासून वंचित

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा पर्यटन समृद्ध आहे. किल्ले, गड, थंड हवेची ठिकाणे अभयारण्य, लेण्या कमी नाहीत. अलिबाग शहरापासून दक्षिण टोकाला हाकेच्या अंतरावर असलेल्या चौल-रेवदंडा जोड गावात पर्यटनवाढीसाठी शासनाने निधी देण्याची गरज आहे. नारळी-पोफळीच्या डौलदार बागा आणि शांत, सुरक्षित असलेला किनारा ही प्राचीन नगरे पर्यटन स्थळे म्हणून आजही विकासापासून वंचित आहेत.

अलीकडे धकाधकीच्या जीवनात सर्वसामान्य माणूससुध्दा खिशाला परवडेल अशा स्थळांच्या शोधात असतो. प्रगत दळणवळणाच्या सहाय्याने एखाद्या महत्त्वाच्या पर्यटनस्थळाला भेट देऊन रात्री परत घरी जाता येईल अशा ठिकाणाच्या शोधात पर्यटक असतात. अनेकांना तर फक्त निवांतपणा हवा असतो. त्यांच्यासाठी चौल-रेवदंडा ही स्थळे परवडणारी असली तरी सुविधांची स्थित बिकट असल्याने मुरुडसारख्या प्रतिगोवा मानल्या गेलेल्या काशिद समुद्रकिनारी जात असलेल्या पर्यटकांचा ओघ येथे थांबवता येऊ शकला तर येथे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील.



● पुरातन रामेश्वर मंदिर व आगरकोट किल्ल्याची वास्तू. (छायाचित्र : अभय आपटे)

अलिबागवरून मुरुडकडे जाताना लागणारी प्राचीन नगरे, अरूंद रस्ते, अनेक ठिकाणी खड्डेमय रस्त्याचा प्रवासामुळे पर्यटकांच्या पसंतीस उतरली नाहीत. उत्तम प्रतिची उपाहारगृहे नाहीत. वाहनतळ नाही, त्यामुळे पर्यटक येथे थांबायला पसंत नाहीत. बाह्यवळण मार्ग असो किंवा किनारा असो, त्या ठिकाणी अनेक प्रसंगी कचर्‍याचे ढीग पडलेले असतात. त्याबद्दलही पर्यटक नाराजी व्यक्त करतात. या किनार्‍यावर पर्यटकांचा अपघात पाण्यात गेल्याने झाल्याची घटना नाही. मात्र, नागाव, ता. अलिबाग व काशिद, ता. मुरुड यांच्या किनार्‍यापेक्षा पर्यटकांचा ओघ कमी आहे.

अनेक वर्षे विविध प्रकारे पर्यटकांना आकर्षित करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. या ठिकाणी जेट्टी मंजूर झाली असल्याने ती प्रत्यक्षात झाली तर पर्यटन व्यवसाय बहरेल यात शंका नाही.

# विज्ञान प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद



। तळा । वार्ताहर ।

तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाच्या बालविकास आणि प्राथमिक विभागाच्या विज्ञान प्रदर्शनास विद्यार्थ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.

या विज्ञान प्रदर्शनाचे उद्‌घाटन प्राथमिक विभागाचे चेअरमन किरण देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्षा स्नेहल तळकर, सदस्य स्नेहल शिंदे, नूतन लोखंडे, शारदा केतकर, किरण सातांबेकर, विनायक महाडकर, युगंधर साबळे, विठ्ठल सुतार, व संस्थेचे उपाध्यक्ष पुरुषोत्तम मुळे यांच्यासह मुख्याध्यापक श्री. भाटे, शिक्षक साबळे, सौ. बांगर, सौ. महाडकर, सौ. पाटील, सौ. पातेरे, सौ. वारगुडे, श्रीम. काप, सौ. पवार, चिले, फोंडळ, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

किरण देशमुख यांनी आपल्या उद्‌घाटनपर भाषणात लहान मुलांना अतिशय सुंदर प्रतिकृती बनविलेल्या आहेत. क्षेत्र कोणतेही असो, कला कोणतीही असो जीवनामध्ये या प्रत्येक गोष्टीचा उपयोग होत असतो. त्यामुळे आपले जीवन निरामय, निरागस होण्यासाठी मदत होत असते. यासाठी पालकवर्गाने लक्ष दिले पाहिजे. शाळेत आम्ही या सर्व कलांना प्राधान्य देतो. जेणे करून शिक्षण बरोबरच भौतिक ज्ञान आत्मसात करता येते, असे बहुमोल विचार व्यक्त केले.

विज्ञान प्रदर्शनात बालविकास विभाग प्रथम क्रमांक स्वरूप साबळे, द्वितीय तन्वी प्रधान, तृतीय सुजल गायकवाड आणि तनवी मोरे, प्राथमिक विभाग इ. १ ली ते इ. २ री प्रथम आरुष महाडकर, द्वितीय श्रीनिती तळकर, तृतीय श्लोक सुतार, इ ३ री ते इ ४ थी प्रथम वेद महाडकर, द्वितीय लावण्या केतकर व प्रज्ञा महाजन आणि तृतीय योग पाटील असे नंबर प्राप्त केले आहेत.

चित्रकला प्रदर्शन छोटा गट प्रथम हसनेन रहाटविलकर, द्वितीय आरुष महाडकर, तृतीय वेद महाडकर, मोठा गट प्रथम श्लोक शिर्के, द्वितीय योग पाटील, तृतीय प्रज्ञा महाजन, रांगोळी प्रदर्शन छोटा गट प्रथम सई शिर्के, द्वितीय आरुष महाडकर, मोठा गट प्रथम मीनाक्षी खांडेकर, द्वितीय प्रज्ञा महाजन, तृतीय परि शिर्के याप्रमाणे विद्यार्थ्यांनी नंबर प्राप्त केले आहेत. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. संतोषसिंह जमादार व प्रा. बाबू शिंदेसर यांनी केले. शेवटी आभार नितेश साबळे यांनी मानले.


## फ्लॅट भाड्याने देणे आहे

ऑफिस साठी नवीन नूतनीकरण केलेले स्वतंत्र घर. सुरक्षित ठिकाण, कर्जत स्टेशनपासून १० मिनिट अंतरावर. ७५० चौरस फूट कार्पेट एरिया, ४ खोल्या, बाथरुम टॉयलेट, पार्किंगची जागा, शांत परिसरात झाडांनी वेढलेले. बँका, विमा, छोटे व्यवसाय, बैंक ऑफिसचे काम, कुरिअर इ. मासिक भाडे रु. १५,000 डिपॉझिट १.५ लाख.

संपर्क: ९८८१७८७००१


# पेढांबे येथे आंबा बागायतदारांसाठी कार्यशाळा

। वाघ्रण । वार्ताहर ।



अलिबाग तालुक्यातील वाघ्रण येथे शुक्रवार, दि. २० डिसेंबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता आंबा कृषी शेतकरी संवाद कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. पेढांबे येथील समाज मंदिरात या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

विजय पाटील टेरिटरी इन्चार्ज ठाणे व सर्व कृषी निविष्ठा विक्रेता अलिबाग व नयन पाटील कृषी विक्रेता फोफेरी यांच्यामार्फत विलोवूड केमिकल लि. या कंपनीने हा कार्यक्रम आयोजित केला. यावेळी मार्गदर्शक म्हणून चंद्रकांत डुमरे जनरल मॅनेजर विलवुड केमिकल लि. व त्यांचे सहकारी राहुल पवार एरिया मॅनेजर पुणे रीजन हे उपस्थित होते. तसेच अलिबाग कृषी अधिकारी जी.बी. पाटील व आरसीएफ जिल्हा प्रमुख प्रभारी अमर घडवे आणि अलिबाग पंचक्रोशीतील आंबा बागायतदार व भाजीपाला पिकवणारे शेतकरी या कार्यक्रमास हजर होते.

कृषी अधिकारी जी.बी. पाटील यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व गणेश पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. संजय पाटील (रांजणखार) यांनी प्रस्तावना करत आलेल्या प्रमुख अतिथींचे पुष्पगुच्छ देऊन नयन पाटील यांनी स्वागत केले. चंद्रकांत डुमरे यांनी उपस्थित आंबा बागायतदार व शेतकऱ्यांना मार्गदर्शन व कंपनीच्या विविध औषधांची अनेक रोगावर माहिती व्हिडिओ क्लिप्स सादर केली.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. लालचंद गंगाधर पाटील, रा. चरी, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून कायम मालकी हक्काने विकत घेऊ इच्छित आहेत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये खरेदी, साठेकरार, संमतीज्ञापन, भागीदारी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, परवाना, बोजा, दान, तारण, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, वारसा, ताबा, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, अग्रहक्क, वहिवाटीच्या रस्त्याचा करार, संपादन, बेचन, जप्ती, दिवाणी अथवा महसूली कोर्टाचा हुकुमनामा, अखत्यारपत्र, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट अे.डी. द्वारे लेखी कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभात कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत, गृहित धरून आमचे अशिल विक्री व्यवहार पूर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ट**

मौजे वाघोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ४९ एकूण क्षेत्र ४ हे. ८६.४० आर, आकार ४३ रूपये ०८ पैसे पैकी श्री. लालचंद गंगाधर पाटील यांच्या मालकीचे खालीलप्रमाणे चतुः सिमांकीत १ हे. ५५.१३ आर, आकार १३ रुपये ७२ पैसे एवढे क्षेत्र.

सदरचे १ हे. ५५.१३ आर क्षेत्रास चतुः सिमा :
पुर्वेस : कोपर-तिनविरा अंतर्गत डांबरी रस्ता.
पश्चिमेस : मौजे वाघोली गट नं. ५० ही ग्रुपग्रामपंचायत खिडकी यांची मिळकत.
दक्षिणेस : मौजे कोपरची शिव.
उत्तरेस : मौजे वाघोली गट नं. ४९ पैकी उर्वरित मिळकत.

अलिबाग
तारीख : २६/१२/२०२४

सही /-
**अ‍ॅड. गणेश गोविंद पाटील.**
अे/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## e-TENDER NOTICE –

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e- Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-23/ 24-25 RFX 7000034195 | SITC of Additional PT bays at various S/stn under Panvel circle. **Tender Fee- Rs. 5000/-+ GST** | **Rs 164.4 Lakhs** |

**EMD 1%** of estimated cost. **Submission of bids from 25.12.2024 to 06.01.2025 up to 11:00 hrs**, **Opening date:-06.01.2025 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/** Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9769006131 E-mail ID **se7200@mahatransco.in**

Sd/-
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद **मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड** येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक **श्री. रामचंद्र शंकर वाघमारे** रायगड यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| पाझर, ता. अलिबाग | २५०/२ | क्षेत्र ०-१४-३० पो.ख.०-००-८० एकूण क्षेत्र ०-१५-१० | ३.७४ |

दिनांक :- २६/१२/२०२४

**अ‍ॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग-रायगड मोबा. ९७६७०१०९०२

## E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-23/24-25/ Rfx No. 7000034218 | AMC for work of Overhauling & Servicing of 220 kV DB & 22 kV Isolators at 400 KV Nagothane s/s under 400 KV RS (O&M) Division Nagothane | **Limited to Rs. 15,00,000/-** | **08.01.2025 up to 23.59hrs** |

**EMD Rs.** 1% of Estimate cost, Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane**

## जाहीर नोटीस

दि. २५/१२/२०२४

तमाम जनतेस कळविण्यात येते की,

खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक **संदीप राम बंदरी** यांनी सदर नोटीस नमुद संपुर्ण मिळकत आमचे अशिलांना नोंदणीकृत दस्ताने विक्री करण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे. |
|---|---|---|---|
| महाळूंगे बुद्रूक, ता. मुरुड | ३५/३/१ | ०-४१-५० | ०-५३ |

वरील नमुद संपुर्ण जमिन मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा करुन घेण्याकरीता सदरची नोटीस देण्यांत येत आहे. तरी देखील या मिळकतीमध्ये इतर कोणाचेही गहाण, दान, लिज, फरोक्त, भागिदार, बक्षिस, मृत्युपत्रांकित दान, ताबेकब्जा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगीहक्क, लिन, इजमेंटरी हक्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास तसेच या मिळकतीबाबत कोणत्याही ठिकाणी वाद तंटे चालु असल्यास अथवा या व्यवहाराला कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी आपली हरकत खाली सही करणार अ‍ॅडव्होकेट यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून चौदा दिवसांत लेखी स्वरुपात पुराव्यासह दाखल करावी व त्याची पोच घ्यावी. या मुदतीमध्ये कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून नमुद मिळकतीचे विद्यमान मालक हे सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील व मागावून येणाऱ्या हरकती विद्यमान मालक तसेच मिळकत खरेदी करणार यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

**अ‍ॅड. मोहीनेश मनोहर ठाकूर**
मोबा नं. ७०५७९०६८१८/८०८००१९११५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे असे कळविणेत येते की, आमचे अशिलांनी मौजे नारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील प्रदिप प्रभाकर गावंड यांच्या मालकीच्या भूमापन क्र.५५ क्षेत्र ०-१८-१०(हे.आर.चौ.मी.) आकार ०.३१ (रू.पै.) ही मिळकत कायम स्वरूपी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने ती मिळकत निर्वेध असल्याची खात्री दिली असून, आमचे अशिलांनी निर्वेध मालकी हक्काच्या दाखल्याची देखील मागणी केली आहे. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट, वगैरे, कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसांचे आंत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडे आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, निर्वेध मालकी हक्काचा दाखला दिला जाईल व आमचे अशिल सदर मिळकत ही निर्वेध आहे असे समजून विद्यमान मालकाबरोबर खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी. येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग,
तारीख: - २५.१२.२०२४.

सही/-
**(अ‍ॅड. मृदुला मयुरेश दाते)**
मु. पो. ००१, बी विंग, प्रतिक अपार्टमेंट,
साने गुरूजी बालोद्यान समोर,
उरण- रायगड. ४००७०२.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत, मिळकतीचे प्रस्थावित मालक श्रीमती शारदा रामचंद्र जळगांवकर व इतर ४ सहहिस्सेदार यांचेकडून आमचे अशिल श्री.गणु गणपत तुपे राहणार:- शिवकर, ता.पनवेल, जि. रायगड यांनी खरेदी विक्रीचे व्यवहारान्वये कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी सदर खालील नमुद शेतजमीन मिळकतीचे मालकी हक्कांबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुतची जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत, सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे .

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे खवली, तालुका सुधागड, जिल्हा-रायगड.**

| गटकमांक व उपविभाग | भू-धारणा पद्धती | आकारणी रू. पै | क्षेत्र हे.आर.चौमी |
|---|---|---|---|
| २३३ | भोगवटादार वर्ग-१ | ०.०९ | ०-१५-०० |

श्रीमती. शारदा रामचंद्र जळगांवकर व इतर ४ सहहिस्सेदार यांचे सामाईक मालकीची, ताबेकब्जातील तसेच वहीवाटेतील एकुण ०-१५-०० हे. आर. चौमी (१५ गुंठे) क्षेत्र असलेल्या जमीन मिळकतीचा श्री. गणु गणपत तुपे यांचेसोबतचा खरेदी विक्रीचा व्यवहार

प्राप्त परिस्थितीत वर नमुद केलेल्या शेतजमीन मिळकतीमध्ये वा सदर मिळकतीच्या कोणत्याही भागावर, क्षेत्रावर सदर मिळकतीचे चर्तुसिमालगत असलेल्या जमीन मालकांचे, कोणाही व्यक्तींचे कसल्याही प्रकारचे करार गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूचा भाडेपट्ट्याचा हक्क, साठेकरार, एम.ओ.यु. अखत्यारपत्र, पोटगी, तत्सम कोणतेही दावे, मालकी, अन्य कसल्याही प्रकारचे हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन पुढील ''२१ दिवसांत'' आपल्या सदर मिळकतीमध्ये असलेल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप लेखी स्वरूपात विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद पत्त्यावर स्वत अथवा वकीलांमार्फत लेखी कळवावे अगर कार्यालयात समक्ष येवुन कागदोपत्री पुराव्यासह भेटावे.

सबब विहीत केलेल्या मुदतीमध्ये कोणाकडुन कसल्याही प्रकारची लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदरहु वर नमुद मिळकतीचे टायटल हे चोख, निर्वेध व बोजाविरहीत असुन त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीबाबतचा तसेच हस्तांतरणाचा व्यवहार प्रस्थावित मालकांसोबत पुर्ण करतील व विहीत मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत तसेच आलेल्या हरकती, तक्रारी, दावे या रद्दबादीत आहेत व त्या जाणीवपुर्वक सोडून दिलेल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
ता. २६/१२/२०२४

**अ‍ॅड. प्रशांत परशुराम वाघमारे**
B.L.S., LL.B.
पत्ता : कार्यालय नं.११३, पहिला मजला,
पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्लेक्स,
वासुदेव बळवंत फडके नाटयगृहाजवळ,
पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०६
(श्री.गणु गणपत तुपे ८८७९५४१७२७/९९३००५००२४)

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

माझे अशिलांनी खाली नमूद केलेली शेती मिळकत सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. अनिल सुरेश खेडेकर आणि सौ. मिना अनिल खेडेकर यांचेंकडून विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे इंद्रपै, ता. अलिबाग, जि. रायगड येथील-**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर. | आकार रू. पै. | विदयमान मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ८ | ०-२२-०० पैकी ०-१०-०० | ४.०२ पैकी २.०८ | श्री. अनिल सुरेश खेडेकर सौ. मिना अनिल खेडेकर |

वर नमूद मिळकतीमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्युपत्र, वहिवाट दावा वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकत विकत घेणेबाबतचा व्यवहार खरेदीखत करून पूर्ण करतील व त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक २५/१२/२०२४

**अ‍ॅड. रविंद्र वि. ओक**
गुरूकृपा, महर्षी महर्षी कर्वे रोड,
द्वारका हॉटेल समोर, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड

## जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतीचे मालक अनिस महमद दाऊद राऊत वगैरे यांजकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे..

संदर्भित जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसलाही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून १४ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास आमचे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतींचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नंबर १५०१/१, एकूण क्षेत्र १-२०-२० हे. आर आकार २८-१३ रु. या मिळकतींपैकी ०-३२-१० हे. आर ही मिळकत.

अलिबाग,
दिनांक : २४.१२.२०२४

सही/-
**(अ‍ॅड. श्री. प्रसाद विजय वर्तक )**
**जिल्हा न्यायालय अलिबाग रायगड.**

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद **मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड** येथिल मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक **श्रीमती माधुरी मधुकर सावंत** रायगड यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ. स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटिस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे बागमळा, ता. अलिबाग, जि. रायगड**

| मौजे | भूमापन क्रमांक उपविभाग | एकुण क्षेत्र (आर. चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| बागमळा ता. अलिबाग | ११७/२/१ | बिनशेती ०-०६-५५ | १३.१० |

दिनांक :- २६/१२/२०२४

**अ‍ॅड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला, बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे. एस. एम कॉलेजजवळ
अलिबाग-रायगड मोबा. ९७६७०१०९०२

## पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड

पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण संस्थेत सन २०२५ सालांतील ३४०० प्रती कॅलेंडर छपाई करावयाची आहे, तरी खालील प्रमाणे सिलबंद कोटेशन मागवीत आहोत.

१. दिनदर्शिका २०२५ साईज ११.२५ इंच बाय १७.५ इंच (साधारण)

२. सहा पानी फ्रंन्ट आणी बॅक पूर्ण पेज मल्टी कलर मध्ये

३. पेपर १०० जी. एस. एम ग्लॉस आर्ट पेपर वापरचा करावा

कॅलेंडर मॅटर कार्यालयात येवून घेवून जावे तसेच प्रुफ तपासणीसाठी पेण कार्यालयात आणावे लागेल .

निवीदा दिनांक ०४/०१/२०२५ पर्यंत दुपारी ३.०० वाजता पेण कार्यालयात पोहचतील आशा बेताने पाठवाव्यात. कोटेशन मजूर नामंजूर करण्याचा आधिकार संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**श्री. नितीन व. वर्तक** सेक्रेटरी
**श्री. मोहन यशवंत पाटील** व्हा. चेअरमन
**श्री. विठोबा लक्ष्मण पाटील** चेअरमन

**पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण रायगड**

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णनाच्या मौजे खारपेढांबे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील मिळकतीचे विद्यमान मालक चारूलता प्रकाश पाटील हे असून यांचेकडून विकत घेणे संदर्भात बोलणी चालु असुन सदर मिळकतींचा व्यवहार करण्याचा ठरलेले आहे. सदर त्या मिळकतींचे वर्णन पुढील प्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | विद्यमान मालक | गट नंबर | क्षेत्र (हे.आर) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| खारपेढांबे, ता.अलिबाग, जि. रायगड | चारूलता प्रकाश पाटील | १२१ | जिरायत ०-२१-८० वरकस ०-०१-५० एकुण क्षेत्र ०-२३-३० | ४.०६ |

सदरच्या मिळकती निर्वेध असल्याबाबत मालकांनी हवाला दिलेला आहे. तरी सदर वर वर्णन मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्र पुराव्यासहीत सादर करावी.

मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कुणाचीही तक्रार अगर हरकत राहिल्यास ती विचारात घेतली जाणार नाही. हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख : २६/१२/२०२४

**अ‍ॅड. पुनित रविंद्र पाटील**
मु. पो. हाशिवरे,
ता. अलिबाग, जि. रायगड
८१४९५१६०३५

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची मौजे पेढांबे, ता.अलिबाग,जि.रायगड येथील मिळकती, त्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम मालकी हक्काने वि घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अनु | मौजे | गट नं | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पै.) | मालकांची नावे |
|---|---|---|---|---|---|
| १. | पेढांबे | ८३ | ००-२०-५० पो.ख. ००-००-०० एकूण ००-२०-५० | ४.७५ | १) साधना पद्माकर पाटील २) किशोर पद्माकर पाटील ३) प्रमोद पद्माकर पाटील ४) दिपीका दिलीप कडू |
| २. | पेढांबे | ८५ | ०१-१३-६० पो.ख. ००-०७-८० एकूण ०१-२१-४० | १८.४३ | पैकी १) प्रज्वला विजय म्हात्रे २) निर्मल सिताराम पाटील ३) मंजुळा सिताराम पाटील यांच्या मालकीची ०-३०-०० (हे.आर) इतकी मिळकत |

सदरच्या संपुर्ण मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध मालकीहक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून त्या विकण्याचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा त्यांनी आमच्या अशिलांस दिलेला आहे, मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतींवर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, बक्षीस, लिज, लिएन या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास, त्यांनी त्यांच्या हरकती अगर तब्जी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित लेखी स्वरुपात आणून द्याव्यात.

मुदतीत कुणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरच्या मिळकती या विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्कांच्या आहेत, असे गृहीत धरुन आमचे अशिल सदरचा खरेदी-विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
ता. २६/१२/२०२४

**अ‍ॅड. विधान अरविंद पाटील**
'वत्सला' टिळक रोड, स्टेट बँकेसमोर
ता. अलिबाग जि. रायगड मो.नं.९४२२३७५११५

## निवडक

### नेणवली शाळेचे यश

**पाली/गोमाशी :** यशवंत पंचायत राज अभियान अंतर्गत पंचायत समिती सुधागड यांच्यामार्फत तालुक्यातील शालेय विद्यार्थीसाठी स्वच्छता या विषयावर चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राजिप नेणवली शाळेने छोट्या व मोठ्या गटातील विद्यार्थी सहभागी झाले होते. या केंद्रस्तरीय चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक श्रेया मगर, द्वितीय क्रमांक ऋतिक मोरे, तर वक्तृत्व स्पर्धेत प्रथम क्रमांक साक्षी सोनावले, द्वितीय क्रमांक संस्कृती खराडे, तृतीय क्रमांक कुणाल बांगारे यांनी पटकावला आहे.

### बुमराहने रचला विक्रम

**नवी दिल्ली :** ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत संघात २६ डिसेंबरपासून मेलबर्नला चौथा कसोटी सामना सुरू होणार आहे. या सामन्याआधी आयसीसीने बुधवारी (दि.२५) ताजी कसोटी क्रमवारी जाहीर केली आहे. या क्रमवारीत भारताचा गोलंदाज जसप्रीत बुमहारने नवा विक्रम केला आहे. कसोटी क्रमवारीत गोलंदाजांच्या यादीत बुमराह अव्वल क्रमांकावर कायम आहे. मात्र, ब्रिस्बेन कसोटीत त्याने घेतलेल्या ९ बळींमुळे आता त्याच्या रेटिंग पॉइंट्समध्ये १४ पॉइंट्सची वाढ झाली आहे. त्याचे ९०४ रेटिंग पॉइंट्स झाले आहेत.

### यू मुंबाची बाद फेरीत धडक

**मुंबई :** यू मुंबा संघाने मंगळवारी (दि.२४) बंगाल वॉरियर्स संघावर विजय मिळवताना प्रो कबड्डी स्पर्धेच्या यंदाच्या मोसमात प्ले ऑफमध्ये पोहोचण्याचा मान संपादन केला आहे. यू मुंबाने बंगाल वॉरियर्सचा ३६-२७ असा पराभव केला. या विजयासह यू मुंबाने गुणतालिकेत पाचव्या स्थानावर झेप घेतली आहे. यू मुंबाचा संघ बाद फेरीत प्रवेश करणार हे निश्चित होते. मात्र, यू मुंबाने मंगळवारी केवळ त्याची औपचारिकता पूर्ण केली. यू मुंबाला बाद फेरी गाठण्यासाठी केवळ एक गुणाची आवश्यक होती.

### मेलबर्नलाही पावसाचा व्यत्यय?

**मेलबर्न :** ऑस्ट्रेलिया विरुद्ध भारत संघात बॉर्डर-गावसकर ट्रॉफी या कसोटी मालिकेतील चौथा सामना २६ डिसेंबर रोजी सुरू होणार आहे. बॉक्सिंग डेला सुरू होणारा हा सामना दोन्ही संघांसाठी मालिकेच्या आणि आयसीसी टेस्ट चॅम्पियनशीपच्या दृष्टीनेही महत्त्वाचा सामना आहे. दरम्यान, या मालिकेतील ब्रिस्बनमध्ये गॅबा स्टेडियमवर झालेला तिसरा सामना पावसामुळे बराच काळ वाया गेला होता. त्यामुळे आता मेलबर्नलाही असाच पावसाचा अडथळा येणार का, असा प्रश्न अनेकांना पडला आहे.

### अर्जुन तेंडुलकरचा विक्रम

**नवी दिल्ली :** सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरने देशांतर्गत क्रिकेटमध्ये विक्रम रचला आहे. अर्जुन तेंडुलकरने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत गोवा संघाकडून खेळताना त्याने मर्यादीत षटकांच्या सामन्यांत ५० बळींचा आकडा पूर्ण केला आहे. त्याने ओडिसाविरूद्ध पहिला सामना खेळाताना ३ बळी घेतले. त्याने ४१ मर्यादीत षटकांच्या सामन्यांत एकूण ५१ बळी घेतले आहेत. ज्यामध्ये १७ अ श्रेणी सामन्यांत २४ बळी व २४ टी-२० सामन्यांत २७ बळींचा समावेश आहे.

# कर्जतमध्ये क्रीडा महोत्सवाचे आयोजन



## तब्बल ६ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत तालुका पंचायत समितीच्या शिक्षण विभागाच्यावतीने जिल्हा परिषद शाळांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कला, क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी, क्रीडा आणि व्यक्तिमत्व विकास शिबिरात तालुक्यातील २७४ शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. तब्बल ६ हजार विद्यार्थ्यांचा सहभाग असलेल्या या स्पर्धेतील विजेते संघ आणि विद्यार्थ्यांची निवड जिल्हा स्पर्धेसाठी करण्यात आली आहे.**

रायगड जिल्हा परिषद सेस फंड आणि शिक्षण विभाग यांच्या माध्यमातून केंद्र स्तरावर आणि नंतर बीट स्तरावर अशा क्रीडा महोत्सव आणि व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवात तालुक्यातील रायगड जिल्हा परिषदेच्या सर्व २७४ शाळेंच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या क्रीडा स्पर्धेत लंगडी, दोरीवरील उड्या, लगोरी आणि बेचकिने नेम धरणे आदी ग्रामीण खेळांचा समावेश करण्यात आला होता. तर, व्यक्तिमत्व विकासात समूह गीत, माती पासून वस्तू घडविणे, पथनाट्य सादर करणे आणि गीत गायन या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

याआधी तालुक्यातील शाळा २१ केंद्र स्तरावरील स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्यातील विजेते हे चार बीटमधील स्पर्धेत सहभागी झाले. तसेच, बीट स्तरावरून तालुका स्तरावर ५० शाळेतील ६०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. तालुका स्तरावरील क्रीडा स्पर्धा या कडाव येथील गजानन विद्यालयात आयोजित करण्यात आल्या होत्या. तर, व्यक्तिमत्व विकास स्पर्धा कर्जत शहरातील महिला मंडळाच्या विद्या विकास मंदिर शाळेत आयोजित करण्यात आल्या होत्या.

या स्पर्धांचे आयोजन गटशिक्षणाधिकारी संतोष दौंड आणि क्रीडा व्यक्तिमत्व विकास स्पर्धेचे तालुका समन्वय समीर येरुणकर यांच्या नियोजनाखाली करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील केंद्रप्रमुख अरुण पारधी, मोहन पाटील, किशोर पाटील, तसेच तालुक्यातील शिक्षक उपस्थित होते. परीक्षक म्हणून नाट्य निर्माते प्रदीप गोगटे, वेदांती गोडबोले, जोशी, अनिल गलगले यांनी कामगिरी पार पाडली.

### क्रीडा स्पर्धेचा निकाल

लहान गट प्रथम क्रमांकः-
बेचकीने नेम धरणेः निकी निरगुडे प्रथम, दोरी उड्या (मुली): गौरी काळन, लंगडी (मुले) सांघिकः गुडवण वाडी शाळा.
मोठा गट प्रथम क्रमांकः-
बेचकीने नेम धरणेः आकाश पादीर, दोरी उड्या (मुली): ईश्वरी कडाळी, लंगडी (मुले) सांघिकः गुडवणवाडी शाळा.

### व्यक्तिमत्व विकास स्पर्धा निकाल

लहान गट प्रथम क्रमांकः-
सांघिक नृत्यः हालिवली शाळा, पथनाट्यः आसल वाडी शाळा, समूहगीतः कुंडलज शाळा, माती पासून शिल्प बनविणेः गणेश भला.
मोठा गट प्रथम क्रमांकः-
सांघिक नृत्यः नेरळ कन्या शाळा, समूहगीतः जामरुंग, पथनाट्यः गुडवण वाडी, मातीपासून शिल्प बनविणेः भावना पंडित कोळंबे.

# पडसरे आश्रमशाळेची बक्षिसांची कमाई



**। पाली/बेणसे । वार्ताहर ।**

आदिवासी विभागाच्या प्रकल्पस्तरीय क्रीडा स्पर्धा शासकीय आश्रमशाला पिंगळस कर्जत या ठिकाणी संपन्न झाल्या. या स्पर्धेचे उद्घाटन प्रकल्प अधिकारी पेण आत्माराम धाबे यांच्या हस्ते करण्यात आले. या स्पर्धेत जिल्ह्यातील आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता. या स्पर्धेत आश्रमशाळा पडसरेनी उत्तम कामगिरी करत अनेक बक्षिसांची कमाई केली आहे.

या स्पर्धेत पडसरे आश्रम शाळेने कबड्डी (मुली), रिले ४ बाय १००, गोळाफेक मध्ये प्रथम क्रमांक, लांब उडी, २०० मीटर धावणे, ५ हजार मीटर चालण्यात द्वितीय क्रमांक आणि उंच उडीत तृतीय क्रमांक पटकावत घव घवित यश मिळविले आहे.

प्रशिक्षक अनिल साजेकर, शिक्षक राजू मोरे, दिपाली घरट, जाणू दोरे, मंगेश गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल कुलाबा जिल्हा आदिवासी सेवा मंडळ पाली अध्यक्ष रवींद्र लिमये तसेच मुख्याध्यापक संदीप शिंदे, मीनाक्षी ढोपे यांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.




● ६ सकसा आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धा २४ व २५ डिसेंबर रोजी रोहा येथे पार पडल्या. या स्पर्धेतील १४ वर्ष वयोगटातील कुमित या प्रकारात उरण तालुक्यातील ओम योगेश पाटीलने सुवर्णपदक व काथा या प्रकारात रौप्य पदक पटकावले आहे. ओमच्या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

# सोहम पवारचा अचूक लक्षवेध

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या उद्दात विचारांतून रा.जि.प. वडगांव शाळेत स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुक्यातील अनेक शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेत माजगांव शाळेत तिसरी वर्गामध्ये शिकत असलेला सोहम पवार याने बेचकीने अचुक लक्षवेध करुन प्रथम क्रमांक पटकावित उपस्थितांची मने जिंकली आहेत.

तसेच, इयत्ता ५ वी ते ७ वी च्या विद्यार्थ्यांनी लगोरी स्पर्धेमध्ये बीटाकडून खेळताना द्वितीय क्रमांक पटकावला आहे. क्रीडा स्पर्धांबरोबर सांस्कृतिक व व्यक्तिमत्व विकास



स्पर्धेचे आयोजन देखील करण्यात आले होते. यावेळी माजगाव केंद्राचे केंद्रप्रमुख परदेशी, गट शिक्षणाधिकारी चोरामले, शिक्षण विस्तार अधिकारी शिल्पा दास, मुख्याध्यापक किरण कवाद, शिक्षिका रेखा जाधव, भुषण पिंगळे अदि उपस्थित होते.

# द्रोणागिरी शरीरसौष्ठव स्पर्धा संपन्न

**। उरण । वार्ताहर ।**

रायगड जिल्हा हौशी शरीर सौष्ठव संघटनेच्या मान्यतेने व द्रोणागिरी स्पोर्ट्स उरण पुरस्कृत जिल्हा स्तरीय हौशी शरीर सौष्ठव 'द्रोणागिरी रायगड श्री' व 'द्रोणागिरी रायगड फिजिक' या स्पर्धा संपन्न झाल्या. या स्पर्धा सोमवारी (दि.२३) उरणमधील यबोकडवीरा येथे पार पडल्या. या स्पर्धेत 'द्रोणागिरी रायगड श्री'चा किताब हार्ड कोर जिम उरणचा अमित पाटील याने, तर 'द्रोणागिरी रायगड फिजिक'चा किताब टॉरनस जिम द्रोणागिरीच्या राकेश तांडेल याने पटकावला आहे. तसेच, बेस्ट पोझरचा सन्मान थ्री ऑक्सिजन



जिम पेणच्या मनीष म्हात्रे याला मिळाला आहे.

दरम्यान, द्रोणागिरी स्पोर्ट्सचे अध्यक्ष सर्वश्री घरत, खजिनदार शिवेंद्र म्हात्रे, संतोष साखरे, जितेंद्र गुरव व अन्य मान्यवरांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन पार पडले. यावेळी पंच म्हणून राष्ट्रीय पंच सर्वश्री, सचिन पाटील, जितेंद्र गुरव व सुरेंद्र महाडिक यांनी काम पाहिले. स्पर्धेचे गुणलेखन राष्ट्रीय पंच भगवान सावंत यांनी केले. स्पर्धेचे सुत्रसंचलन राष्ट्रीय पंच संतोष साखरे तर स्टेज मार्शल म्हणून सर्वश्री रुईकर, प्रतीक दरणे व प्रथमेश नागे यांनी काम पाहिले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शिवेंद्र म्हात्रे यांनी केले.

# कोपर केंद्राच्या स्पर्धा उत्साहात

**। हमरापूर । प्रतिनिधी ।**

पेण तालुक्यातील कोपर केंद्राच्या क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धा केंद्रप्रमुख किशोर पाटील यांच्या नेतृत्वात रा.जि.प. शाळा हनुमान पाडा येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाल्या. यावेळी क्रीडा प्रकारांमध्ये मुलांसाठी लगोरी, बेचकीने नेम धरणे, तसेच मुलींसाठी लंगडी आणि दोरी उडी या खेळांच्या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. तर, व्यक्तिमत्व विकास अंतर्गत पारंपारिक गीतावर नृत्य, समूहगीत गायन, पथनाट्य आणि मातीचे शिल्प तयार करणे या स्पर्धा घेण्यात आल्या होत्या.



यावेळी, स्पर्धेच्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद केंद्र प्रमुख किशोर पाटील यांच्यासह अनंत म्हात्रे, मारुती पाटील, र.मो. पाटील, शिक्षक वर्ग आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच, स्पर्धा काळात सरपंच जयवंती पाटील, उपसरपंच गणेश घरत, माजी सरपंच प्रवीण पाटील, सरपंच राकेश दाभाडे, युवराज म्हात्रे, सरपंच वाघमारे तसेच जोहे केंद्राचे केंद्रप्रमुख प्रमोद पाटील यांनी भेट दिली.स्पर्धेत विविध खेळात प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते चषक देऊन सत्कार करण्यात आला.

# वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण

**। रसायनी । वार्ताहर ।**

विद्याप्रसारिणी सभा चौक संचलित सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर व यशवंतराव देशमुख कनिष्ठ महाविद्यालयाचा वार्षिक क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला. प्रमुख अतिथी, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू व प्रशिक्षक विश्वनाथ रामचंद्र पाटील यांच्या हस्ते उद्घाटन समारंभ पार पडला.

यावेळी क्रीडा शिक्षक शरद कुंभार यांनी आपल्या प्रास्ताविकातून क्रीडा क्षेत्रात आपल्या शाळेतील खेळाडू विद्यार्थी हे तालुका, जिल्हा आणि विभागीय स्तरावर



चमकदार कामगिरी करत असून शाळेचे नाव उंचावत आहेत. अशा खेळाडू विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप मिळावी. म्हणूनच आपण जाहीरपणे क्रीडा पारितोषिक वितरण समारंभ घेत आहोत, असे सांगितले. यावेळी, प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते अतिशय दिमाखदार पद्धतीने विजेत्या स्पर्धक विद्यार्थ्यांना सन्मानित करत त्यांचे अभिनंदन करण्यात आले. तसेच, उत्कृष्ट खेळाडू ऋषी जोमा भस्मा व दीपिका जयवंत डुकरे यांचे विशेष कौतुक करत दोन्ही चॅम्पियन खेळाडूंना वैयक्तिक ५०० रुपयाचे रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

यावेळी, संस्थेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. अविनाश देशमुख, शोभाताई देशमुख, मुख्याध्यापिका सुलभा गायकवाड, दिनेश पाटील, पुजारी, मोळीक, कांबळे, सुवर्णा मोरे, व विद्यार्थी प्रतिनिधी उपस्थित होते.

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात

# जिल्हास्तरावर कौशल्य दाखवण्याची संधी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

'चला खेळूया, आनंदी होऊया' हे ब्रीदवाक्य डोळ्यांसमोर ठेवून शिक्षण विभाग पंचायत समिती माणगाव यांच्यावतीने तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्व विकास स्पर्धांचे आयोजन गोरेगाव येथील ना.म. जोशी विद्याभवनात करण्यात आले होते. या स्पर्धांचे उद्घाटन गोरेगाव सहाय्यक पोलीस निरीक्षक सुर्वे यांच्या हस्ते व गटशिक्षणाधिकारी सुरेखा तांबट यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले.

स्पर्धेदरम्यान क्रीडा प्रकारांमध्ये लंगडी, लगोरी, दोरी उडी, बेचकी आदी खेळांचा, तर व्यक्तिमत्व विकास स्पर्धांमध्ये पारंपारिक नृत्य, पथनाट्य, समूह गायन व माती शिल्प आदी कलाविष्कारांचा समावेश करण्यात आला होता. या स्पर्धांमधील सर्व विजेते व उपविजेत्यांना मेडल्स व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच, या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकावर विजेते ठरलेल्या क्रीडापटू, कलाकार व संघांना जिल्हास्तरावर आपले कौशल्य दाखवण्याची संधी उपलब्ध करून दिली जाणार आहे.



### क्रीडा स्पर्धांचे निकाल

लहान गटः- लंगडीः प्रथम गोरेगाव बीट, द्वितीय तळाशेत बीट, तर तृतीय निजामपूर बीट. लगोरीः प्रथम गोरेगाव बीट, द्वितीय साई बीट, तर तृतीय उतेखोल बीट. दोरी उडीः प्रथत सांच काठाडे, द्वितीय श्रुती वाघमारे, तर तृतीय सानिका बागवे. बेचकीः प्रथम मयूर जाधव, तर द्वितीय शैलेश हिलम.

मोठा गटः- लंगडीः प्रथम उतेखोल बीट, द्वितीय कडापे बीट, तर तृतीय निजामपूर बीट. लगोरीः प्रथम तळाशेत बीट, द्वितीय उतेखोल बीट, तर तृतीय साई बिट. दोरी उडीः प्रथम ऐश्वर्या जाधव, द्वितीय वैशाली हिलम, तर तृतीय धनश्री रेवाळे. बेचकीः प्रथम राहुल जाधव, द्वितीय सचिन पवार, तर तृतीय योगेश वाघमारे.

### व्यक्तिमत्व विकास स्पर्धांचे निकाल

लहान गटः- पारंपारिक नृत्य: प्रथम तळाशेत बीट, द्वितीय गोरेगाव बीट तर, तृतीय साई बीट. पथनाट्य: प्रथम साई बीट, द्वितीय तळाशेत बीट, तर तृतीय गोरेगाव बीट. समूह गायन: प्रथम तळाशेत बीट, द्वितीय गोरेगाव बीट, तर तृतीय उत्तेखोल बीट. माती शिल्प: प्रथम अक्षरा सूर्यवंशी, द्वितीय अलोक सुतार, तर तृतीय समिधा सहस्त्रबुद्धे.

मोठा गटः- पारंपारिक नृत्य: प्रथम गोरेगाव बीट, द्वितीय तळाशेत बीट, तर तृतीय निजामपूर बीट. पथनाट्यः प्रथम उतेखोल बीट, द्वितीय कडापे बीट, तर तृतीय निजामपूर बीट. समूह गानः प्रथम उतेखोल बीट, द्वितीय निजामपूर बीट, तर तृतीय गोरेगाव बीट. माती शिल्पः प्रथम आर्यन भिलारे, द्वितीय सोहम सुतार तर तृतीय आस्था मालोरे.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)